महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ९, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २८ मे २०२४ ते सोमवार ३ जून २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## ‘हिट अँड रन’ प्रकरणात महायुतीतील सत्ताधारी आमदार- मंत्री आरोपींचे ‘गॉडफादर’..- विजय वडेट्टीवार



■ मुंबई: विशाल कारंडे

**पुण्यामधील कल्याणीनगर येथे एका बड्या उद्योगपतीच्या ‘बाळा’ने मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे कार चालवून दोन जणांच्या घेतलेल्या बळीचं प्रकरण आता आता चांगलंच तापलं आहे. दरम्यान, या प्रकरणात आरोपीच्या रक्ताचे नमुने ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी बदलल्याचे समोर आल्यानंतर खळबळ उडाली आहे.**

या डॉक्टरांवर अटकेची कारवाई झाल्यानंतर सदर डॉक्टराची नियुक्ती ही आमदार सुनील टिंगरे यांच्या शिफारशीवरून झाल्याचे समोर आले आहे. त्यानंतर आता विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधारी महायुती सरकार गंभीर आरोप केले आहेत.

या प्रकरणी केलेल्या ट्विटमध्ये विजय वडेट्टीवार म्हणाले की, पुण्यातील ’हिट अँड रन’ प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होता हे समोर येत आहे. ज्या डॉक्टरांनी या प्रकरणात रक्ताचे नमुने बदलले त्याला ससून रुग्णालयात अधीक्षक पदाची जबाबदारी द्यावी असे शिफारस पत्र अजित पवार गटाचे आमदार सुनील टिंगरे यांनी पत्र लिहून मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे मागणी केली होती. भ्रष्ट अधिकाऱ्यांना शिफारस पत्र लिहून पदावर बसवण्यात येत आहे. राजकीय पाठबळ असल्यामुळेच नियम आणि कायदे धाब्यावर बसवून निष्पाप लोकांचा जीव घेणाऱ्या आरोपींना वाचवण्याइतकी ह्या अधिकाऱ्यांची हिंमत होत आहे, असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

दरम्यान, कल्याणीनगर हिट अँड रन प्रकरणातील आरोपी ’बाळा’च्या रक्ताचे नमुने बदण्याचा आरोप असलेले डॉ. अजय तावरे यांच्याकडे ससूनच्या अतिरिक्त अधीक्षकपदी नियुक्ती करण्यासाठी आमदार सुनील टिंगरे यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रिफ यांच्याकडे केली होती, याबाबतचे पत्र सोमवारी समोर आले होते. तसेच मुश्रिफ यांनी ही शिफारस मान्य करण्याचा अभिप्राय या पत्रावर दिला होता. त्यावरून आता नव्या वादाला तोंड फुटले आहे.

## संक्षिप्त

### जनतेच्या जीवनात समृद्धी का नाही? पंतप्रधानमोदी यांना प्रियंका गांधी यांचा सवाल

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असेल, तर लोकांच्या जीवनात समृद्धी का नाही, असा सवाल करत काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकावर जोरदार टीका केली. फतेहगढ साहिब



मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार अमरसिंग यांच्या प्रचारसभेत प्रियंका गांधी बोलत होत्या. पंतप्रधान मोदी हे केवळ सत्ता मिळवण्यासाठी खोटे बोलत आहेत. त्यांनी जनतेला खोटी आश्वासने दिली आहे, असा हल्लाबोल करताना त्या म्हणाल्या की, देशात ७० कोटी तरुण बेरोजगार आहेत आणि बेरोजगारी ही ४५ वर्षातील सर्वाधिक आहे. मोदी यांच्या केंद्रातील सरकारच्या काळात सरकारी क्षेत्रात ३० लाख पदे रिक्त आहेत. अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असल्याचे मोदी टप्प्याटप्प्याने मोठे दावे करतात.

### उन्हाचा पारा ५१ अंशांवर; पुढचे तीन ते चार दिवस रेड अलर्ट

■ नवी दिल्ली-वृत्तसंस्था

उत्तर भारतात उष्णतेची लाट आणखी तीव्र झाली असून राजस्थानमधील फालोदी गावातील तापमानाचा पारा रविवारी ५१ अंशांवर गेला होता. राजस्थानमध्ये पुढील तीन ते चार दिवस असेच तापमान राहणार असून हवामान विभागाने येथे ‘रेड अलर्ट’



जारी केला आहे. देशात मागील काही दिवसांपासून अनेक राज्यांमध्ये उष्णता वाढली असून उत्तर भारतात उष्णतेची लाट आली आहे. तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ झाली आहे. राजधानी दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातही आज ४७ अंशांच्या आसपास तापमान होते. देशात सर्वाधिक तापमान आज राजस्थानमधील फालोदी गावात नोंदले गेल्याचे हवामान विभागातील वरिष्ठ शास्त्रज्ञ नरेशकुमार यांनी सांगितले. याठिकाणी ५१ अंश तापमान नोंदले गेले. राजस्थानसह उत्तर भारतात पुढील तीन ते चार दिवस असेच तापमान राहणार आहे. हवामान विभागाने राजस्थान आणि हरियानासाठी ‘रेड अलर्ट’ जारी केला आहे. पंजाबमध्येही दोन दिवस ‘ऑरेंज अलर्ट’ असून नंतर येथेही ‘रेड अलर्ट’ असेल, असे नरेशकुमार यांनी सांगितले. वाढत्या उन्हामुळे दैनंदिन जनजीवनावर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. अनेक जण दुपारी घराबाहेर पडण्याचे टाळत आहेत.

## ‘महायुतीत राष्ट्रवादीला विधानसभेच्या ९० जागा मिळणार?’ भुजबळांच्या मागणीवर अजित पवार, प्रफुल्ल पटेल म्हणाले...

■ मुंबई: संजीनी खाडे

‘लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपात महायुतीत खटपट होता कामा नये’, असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे अन्न तथा नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केलं आहे. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची आज एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. त्या बैठकीत छगन भुजबळ म्हणाले, ‘आपल्या हक्काचा वाटा आपल्याला मिळालाच पाहिजे.’ भुजबळ यांनी यावेळी, भारतीय जनता पार्टीने आपल्याला विधानसभा निवडणुकीत ८० ते ९०



जागा देण्याचा शब्द दिल्याची आठवण करून दिली. दरम्यान, ‘विधानसभेवेळी लोकसभेसारखं चित्र राहणार नाही’ असं उत्तर प्रफुल्ल पटेल (अजित पवार गटातील नेते) यांनी दिलं. तर, ‘विधानसभेला सर्वांचाच मानसन्मान केला जाईल, असा शब्द भाजपाने आपल्याला दिला आहे’, असं अजित पवार यावेळी म्हणाले. छगन भुजबळ म्हणाले, ‘लोकसभा निवडणुकीत महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाला सर्वात कमी जागा मिळाल्या. मात्र, विधानसभा निवडणुकीत आम्हाला ८० ते ९० जागा मिळाल्या पाहिजेत. लोकसभा निवडणुकीत जी खटपट झाली, ती खटपट विधानसभा निवडणुकीत होता कामा नये. महायुतीमध्ये आपल्याला योग्य तो वाटा मिळायला हवा. आपण महायुतीत आलो तेव्हा त्यांनी आपल्याला ८० ते ९० जागा मिळतील असं सांगितलं होतं.

## ‘जे लोक गांजा पिऊन लेख लिहितात...’, देवेंद्र फडणवीसांचा संजय राऊतांना टोला

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशावर पुतीनप्रमाणे राज्य केलं आहे आणि देशाला गुलाम बनवलं आहे. दहा वर्षांमध्ये गुलाम जन्माला घातले असं म्हणत रोखठोक या सदरात लेख लिहिला. या लेखाबाबत प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांना आपल्या खास शैलीत टोला लगावला आहे.**

■ मुंबई: यश सावंत

‘नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांची राजवट ४ जून रोजी संपते आहे याबाबत कुणाच्याही मनात शंका नाही. या दोघांना सत्तेवरुन दूर करण्यासाठीच देशातल्या जनतेने मतदान केले आहे. मोदी आणि शाह यांनी देशाचा तुरुंग केला व लोकशाहीलाच बंदिवान आहेत. ४ जून नंतर काय? यावर चर्चा सुरु आहेत. मोदी आणि शाह यांचा पराभव झाला तरी ते सहज सत्ता सोडणार नाहीत. एखाद्या हुकूमशाहप्रमाणे ते सत्ता सोडण्यास नकार देतील असं बोललं जातं आहे, ते खरे नाही. ४ जून नंतर देशाच्या राज्यघटनेला उभारी मिळणार आहे. लष्करप्रमुख, पोलीस



केले. त्यामुळे मोदी शाह यांचा पराभव होऊ शकत नाही असा भ्रम निर्माण झाला. मोदी हे देवाचे अवतार आहेत असे चित्र निर्माण करण्यात आले. त्यामुळे घरात अन्न, वीज, पाणी, रोजगार, निवारा नाही तरीही मोदी हवेत. माती खाऊन जगू असं म्हणणारे अंधभक्त या काळात दिसले. पण ज्यांनी आत्तापर्यंत मोदींना मतदान केलं तो शेतकरी, कष्टकरी वर्गच मोदींच्या विरोधात उभा ठाकला.’ ‘पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशावर रशियाच्या पुतिनप्रमाणे राज्य केलं आणि देशाला गुलाम केलं. तसंच देशात गुलाम जन्माला घातले. गुलामही बंड करतोच. निवडणुका जवळजवळ संपल्या प्रशासन यांचे प्रमुख मोदी आणि शाह यांचं काही एक ऐकणार नाहीत.’ असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली आहे. या टीकेबाबत देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिलं आहे.

‘मी आधीच तुम्हाला सांगितलं आहे की संजय राऊतांबाबत मला विचारत जाऊ नका. जे लोक गांजा पिऊन लेख लिहितात त्यांच्यावर मी बोलत नाही. मी ऐकलं आहे की लंडनमध्ये आहेत, तिथे चांगले मानसोपचार तज्ज्ञ आहेत. योग्य ते औषध त्यांनी घ्यावं’ असा टोला देवेंद्र फडणवीस यांनीच लगावला आहे.

## कोकण पदवीधरमधून मनसेचे अभिजीत पानसे महायुतीचे उमेदवार? निरंजन डावखरेंचा पत्ता कट?

■ मुंबई: सम्यक कासारे

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून कोकण पदवीधरसाठी उमेदवार रिंगणात उतरवला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातून मनसेकडून अभिजीत पानसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मनसेच्या अधिकृत ट्विटर हँडलवरुन ट्वीट करत यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.



मनसेनं केलेल्या ट्वीटमध्ये म्हटलं आहे की, ’सन्माननीय राजसाहेबांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते श्री. अभिजित पानसे यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.’सन्माननीय राजसाहेबांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते श्री. अभिजित पानसे यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

कोकण पदवीधरमधून मनसेने अभिजीत पानसेंना उमेदवारी जाहीर केली. मात्र, आता पानसेंची उमेदवारी ही मनसेची की महायुतीची? असा सवाल उपस्थित झाला आहे. कोकण पदवीधरमधून डावखरे हे भाजपचे आमदार आहेत.

## शरद पवारांनी ठाकरेंना आमच्यापासून तोडले; हा खेळ ज्यांनी सुरु केला त्यांनीच तो संपवावा; अमित शाहांचं सूचक वक्तव्य

■ नवी दिल्ली प्रगती शर्मा

एनडीएनं शेवटच्या टप्प्याआधीच बहुमताचा टप्पा गाठलाय असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी केलीय. अमित शाहांनी एका इंग्रजी दैनिकाला मुलाखत दिली, त्यात त्यांनी हा दावा केला. विरोधी पक्ष किती सक्षम असावा हा निर्णय आता जनतेनं घ्यावा असं शाह म्हणाले. अखेरचा टप्पा पार होण्याआधीच एनडीएने ३०० जागांचा आकडा गाठल्याचं ते म्हणाले. राज्यात उद्धव ठाकरेंना पुन्हा सोबत घेणार का या प्रश्नालाही त्यांनी उत्तर दिलं. राज्यात आमची शिवसेनेशी युती आहे, आणि युतीत सर्वकाही आलबेल आहे असं ते म्हणाले. तसेच त्यांनी शरद पवारांवर देखील निशाणा साधला आहे.



घड्याळाचे काटे उलटे फिरवून २०१९ ची परिस्थिती पुन्हा आणणे शक्य असते तर तुम्ही महाराष्ट्रात वेगळ्याप्रकारे गोष्टी केल्या असत्या का, असा प्रश्न अमित शाह यांना विचारण्यात आला. यावर अमित शाह यांनी शरद पवार यांना लक्ष्य केले. यावर अमित शाह म्हणाले, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आम्हाला बहुमत मिळाले होते. शरद पवारांनी आमचे मित्र उद्धव ठाकरे यांना आमच्याकडून तोडले. उद्धव ठाकरे आमचे मित्र होते, आम्ही युती म्हणून निवडणूक लढवली होती. ते आमचे मित्र होते, आम्ही निवडणूक एकत्रपणे युतीत लढवली होती. ज्याने हे सगळं सुरु केलं त्यानेच हे संपवलं पाहिजे.

अमित शाह म्हणाले, आम्ही अखेरचा टप्पा गाठण्याआधीच आम्ही बहुमताचा टप्पा गाठला आहे. आम्ही शेवटच्या टप्प्या अगोदर ३०० ते ३५० जागांच्या आसपास होतो. अजून यामध्ये शेवटच्या टप्प्यातील जागा नाहीत.अखेरचा टप्पा पार होण्याअगोदरच भाजप सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत होते. आम्ही ४०० पार जाणार आहोत.

## दिवाळीआधी राज्याला मिळणार नवं सरकार; ‘या’ तारखांना विधानसभेचं मतदान होणार?

■ मुंबई: नितीन देवळेकर

लोकसभा निवडणुकीतील शेवटच्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी पार पडणार असून ४ जून रोजी निकाल लागणार आहे.





मात्र लोकसभेच्या निकालाआधीच राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीची तयारी सुरु झाल्याचं चित्र पाहायला मिळत. महाराष्ट्रातील विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. तर हरिणायामधील विधानसभा ३ नोव्हेंबर रोजी विसर्जित होत आहे. त्यामुळे या दोन्ही राज्यांच्या निवडणूक एकाच वेळी घेतल्या जाऊ शकतात. म्हणजेच राज्यात दिवाळीपूर्वी ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये मतदान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विधानसभेच्या विसर्जनाच्या नियमाप्रमाणे मुदत संपण्याआधी किंवा मुदत संपल्याच्या दुसऱ्याच दिवशी नवीन विधानसभा अस्तित्वात येणे गरजेचे असते. म्हणजेच सध्याच्या स्थितीमध्ये हरियाणात कितीही उशीरा निवडणूक घेतली तर विधानसभा ४ नोव्हेंबरआधी अस्तित्वात येणं गरजेचं आहे. तर महाराष्ट्रामध्ये २७ नोव्हेंबर ही नव्या विधानसभेच्या स्थापनेची ’डेडलाइन’ असेल. २००९ सालापासून महाराष्ट्र आणि हरिणायातील विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेतल्या जातात. दोन्ही विधानसभांमधील अंतर केवळ २३ दिवसांचं असल्याने नियमानुसार आणि निवडणुकीच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने दोन्ही निवडणुका एकत्र घेणं अधिक संयुक्त ठरणार आहे.

## राज्यात दहावीचा निकाल ९५.८१ टक्के; कोकण विभाग सर्वात अव्वल, तर यंदाही मुलींनीच मारली बाजी!

■ पुणे: अभिजीत येरल्लू

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. दहावीचा यंदाचा एकूण निकाल ९५.८१ टक्के इतका लागला आहे. यंदाच्या निकालामध्ये कोकण विभागानं बाजी मारली असून नागपूर विभाग मात्र तळाशी आहे. नागपूर विभाग ९४.७३ टक्क्यांसह राज्यातील विभागनिहाय टक्केवारीनुसार सर्वात खाली आहे. तर निकालांमध्ये पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल ९७.२१ टक्के तर मुलांचा निकाल ९४.५६ टक्के लागला आहे. आकडेवारीनुसार, सर्वच विभागांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे. एकूण ७२ विषयांपैकी १८ विषयांचा १०० टक्के लागला आहे. दरम्यान, दहावीच्या परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांच्या निकालाची एकूण टक्केवारी ९४.८६ टक्के इतकी आहे. निकाल जाहीर करण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीनं पत्रकार परिषद घेण्यात आली. पत्रकार परिषदेतून निकालासंदर्भातील ठळक माहिती देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३ -२०२४ मध्ये दहावीच्या परीक्षेसाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख ९ हजार ५४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

**विभागनिहाय निकाल (टक्केवारी)**

| | |
|---|---|
| पुणे | ९६.४४ टक्के |
| नागपूर | ९४.७३ टक्के |
| छ. संभाजीनगर | ९५.१९ टक्के |
| मुंबई | ९५.८३ टक्के |
| कोल्हापूर | ९७.४५ टक्के |
| अमरावती | ९५.५८ टक्के |
| नाशिक | ९५.२८ टक्के |
| लातूर | ९५.२७ टक्के |
| कोकण | ९९.०१ टक्के |



# साफसफाई केलेल्या नदी-नाल्यांमध्ये कचरा टाकू नये, महानगरपालिका प्रशासनाचे आवाहन

■ मुंबई: यश सावंत

**मुंबई : गाळ उपसलेल्या आणि तरंगता कचरा काढलेल्या नदी - नाल्यांमध्ये कचरा टाकण्याचे प्रकार वारंवार घडतात. परिणामी, प्रशासनाला वारंवार त्याच ठिकाणी तरंगता कचरा काढण्यासाठी यंत्रणा खर्च करावी लागते. तसेच स्वच्छता केल्यानंतरही नाल्यांत आढळणाऱ्या कचऱ्यामुळे अकारण महानगरपालिकेवर टीका केली जाते. अशा प्रकारचा कचरा आणि मोठ्या आकाराच्या, अवजड वस्तू नदी - नाल्यांमध्ये अडकून मुसळधार पावसाच्या वेळी पाणी तुंबण्याची शक्यता वाढते.**

त्यामुळे नागरिकांनी अशा घटना टाळण्यासाठी गाळ उपसा केलेल्या नदी नाल्यांमध्ये कचरा, तसेच वस्तू टाकू नये, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

महानगरपालिकेकडून मुंबईतील लहान मोठे नाले, नद्यांमधील गाळ काढण्याच्या कामांना वेग देण्यात आला आहे. ही सर्व कामे पावसाळ्यापूर्वी वेळेत आणि योग्यप्रकारे पूर्ण करावीत, जिथे गाळ उपशाची कामे पूर्ण झाली असतील तेथील मनुष्यबळ आणि संयंत्रे आवश्यक ठिकाणी न्यावीत, असे आदेश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी, तसेच अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी पाहणी दौऱ्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या कामांची पाहणी करून योग्य ते आदेश देण्याच्या दृष्टीने अश्विनी जोशी यांनी शहर विभागात, तर अभिजीत बांगर यांनी शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरात सुरू असलेल्या कामांची शनिवारी पाहणी केली. अश्विनी जोशी यांनी एफ दक्षिण विभागातील प्रतीक्षा नगर बस डेपो कंपाऊंड नाला, जे. के. केमिकल नाला, शास्त्रीनगर नाला, डब्ल्यूटीटी नाला येथील



गाळ काढण्याच्या कामांची पाहणी केली. त्यानंतर जी उत्तर विभागात शीव रुग्णालय परिसरातील रावळी नाला, दादर धारावी नाला, राजीव गांधी नगर नाला, राजीव गांधी नगर, लूप रोड आणि लाल बहादूर शास्त्री मार्ग येथेही प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी विविध ठिकाणी मलनिःसारण, पर्जन्य जल आदी वाहिन्यांवर मनुष्य प्रवेशिकांच्या (मॅनहोल) जागी बसवलेल्या प्रतिबंधक जाळ्या तसेच झाकणांचीही पाहणी केली. आवश्यक त्या सर्व ठिकाणी मनुष्य प्रवेशिकांवर जाळी आणि झाकणे बसवण्याची कार्यवाही वेगाने करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. यावेळी उप आयुक्त प्रशांत सपकाळे, सहायक आयुक्त चक्रपाणी अल्ले आदी उपस्थित होते. पूर्व आणि पश्चिम उपनगरातील रस्ते कामांनाही वेग अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी पूर्व आणि पश्चिम उपनगरातील नाल्यातून गाळ काढण्याच्या कामांसह रस्ते कामांचाही प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेतला. बांगर यांनी पूर्व उपनगरातील पीएमजीपी नाला, देवनार नाला, मिठी नदीचा बक्षीसिंग कंपाऊंड येथील परिसर, पश्चिम उपनगरातील एसएनडीटी नाला लिडो टॉवर, मीलन भूयारी मार्ग, तसेच अंधेरी भूयारी मार्ग येथे जाऊन गाळ काढण्याच्या कामांची पाहणी केली.

## स्वच्छता मोहिमेतून शनिवारी १३० मेट्रिक टन राडारोडा गोळा, एकूण ३० मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू व ७९ मेट्रिक टन कचरा जमा

■ मुंबई: संजीनी खाडे

**महानगर पालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागातील विविध ठिकाणी शनिवारी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान १३० मेट्रिक टन राडारोडा (डेब्रीज), ३० मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू आणि ७९ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. तसेच, ३३६ किलोमीटर लांबीचे रस्तेही स्वच्छ करण्यात आले.**

मुंबई गेल्या २७ आठवड्यांपासून सखोल स्वच्छता मोहीम सुरू आहे. या मोहिमेला व्यापक स्वरूप देत प्रत्येक शनिवारी पालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागात नियमितपणे स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शनिवारी सर्व प्रशासकीय विभागात (वॉर्ड) लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात १३० मेट्रिक टन राडारोडा, ३० मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू आणि ७९ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. तसेच, सुमारे ३३६ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर ब्रशिंग करून धूळ काढण्यात आली. एकूण १ हजार ५४३ कामगार – कर्मचाऱ्यांसह जेसीबी, डंपर, कॉम्पॅक्टर, कचरा संकलन करणारी वाहने, पाण्याचे टँकर अशी विविध वाहने आणि फायरेक्स यंत्र, मिस्टींग यंत्र आणि अन्य अद्ययावत



यंत्रणांच्या साहाय्याने ही कामगिरी करण्यात आली. पी दक्षिण विभागात कृष्णवाटिका मंदिर परिसर, टी विभागात मुलुंड पश्चिम येथील डॉ. आर. आर. मार्ग, आर दक्षिण विभागात कांदिवली (पश्चिम) येथे मिलाफ सिनेमागृह परिसर, स्वामी विवेकानंद मार्ग, एम पूर्व विभागात वामन तुकाराम पाटील मार्ग, के पश्चिम विभागात व्ही. एम. मार्ग, एल विभागात कुर्ला पूर्व येथे हशू आडवाणी चौक, शिवसृष्टी मार्ग, आर उत्तर विभागात दहिसर पूर्व येथे गणपत पाटील नगर, के पूर्व विभागात प्रभाग ७८ मध्ये झोपडपट्टी व तत्सम परिसर, पी उत्तर विभागात टाईम्स ऑफ इंडिया पूल परिसर, एस विभागात टागोर नगर, ए विभागात चर्चगेट येथील विठ्ठल ठाकरसी मार्ग, ज्ञानसम्राट मार्ग, डी विभागात श्रीमद् राजचंद्र मार्ग, गगनगिरी महाराज मठ ते तांबे चौक, एच पूर्व विभागात सांताक्रुज येथे कलिना जंक्शन ते रझाक जंक्शन, कॉज वे आदी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

## मिठी नदीच्या रुंदीकरणाआड आलेल्या १४९ बांधकामांवर पालिकेचा हातोडा

■ मुंबई: रघुवीर जाधव

मिठी नदी रूंदीकरण प्रकल्पात अडथळा ठरणाऱ्या एकूण १४९ बांधकामांवर शुक्रवार आणि शनिवारी महानगरपालिकेने निष्कासनाची कारवाई केली. सलग दोन दिवस करण्यात आलेल्या कारवाईमुळे सुमारे ८ हजार चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त झाले. तसेच, रूंदीकरणासाठी सुमारे ३०० मीटर रूंदीचे क्षेत्र उपलब्ध झाले आहे. उच्च न्यायालयाने निष्कासन कार्यवाहीला परवानगी दिल्यानंतर पालिकेच्या एल विभाग कार्यालयाने सांताक्रूझ – चेंबूर रस्त्यालगत ही कारवाई केली. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अमित सैनी यांनी प्रकल्पस्थळी पाहणी करून वेळोवेळी ही अतिक्रमणे हटवण्याच्या कार्यवाहीचा पाठपुरावा केला होता. तसेच रूंदीकरण प्रकल्पाला अडथळा ठरणारी बांधकामे हटवण्यासाठी न्यायालयीन प्रक्रियेच्या पूर्ततेसाठी सातत्याने प्रयत्न केले होते. अतिक्रमण निष्कासन पूर्ण झाल्यामुळे मिठी नदी रूंदीकरण प्रकल्पांतर्गत येथे तातडीने संरक्षक भिंत बांधण्याची सूचना पर्जन्य जलवाहिन्या विभागाला करण्यात आली आहे. या निष्कासन कार्यवाहीदरम्यान पर्जन्य जलवाहिन्या विभागाने तातडीने संयंत्रांचा पुरवठाही केला होता. त्यानुसार, प्रकल्पस्थळी पर्जन्य जलवाहिन्या विभागाने तातडीने संरक्षण भिंत बांधण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, निष्कासन कार्यवाही करण्यात आलेल्या ठिकाणी पुढील चार आठवड्यांत पात्र गाळेधारकांना अंतरिम भरपाई किंवा त्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात येणार आहे.



प्रकल्पाच्या ठिकाणी सातत्याने होणारा स्थानिकांचा विरोध आणि प्रदीर्घ कायदेशीर लढ्यानंतर विविध विभागांमध्ये समन्वय साधून ही निष्कासन कार्यवाही पार पडली. एल विभागासोबत विविध विभागांचा संयुक्त सहभाग अतिक्रमणे निष्कासित करण्याच्या कार्यवाहीत मोलाचा होता, अशी माहिती उपआयुक्त देविदास क्षीरसागर यांनी दिली. तसेच, रूंदीकरण प्रकल्पात अडथळा ठरणारी उर्वरित बांधकामे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून येत्या काळात निष्कासित करण्यात येतील, असे सहायक आयुक्त धनाजी हेर्लेकर यांनी सांगितले.

## अंधेरीत २९, ३० मे रोजी पाणीपुरवठा बंद, काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा

■ मुंबई: माधव अलवा

मुंबई महानगरपालिकेतर्फे अंधेरी येथील बी. डी. सावंत मार्ग व कार्डिनल ग्रेसिअस मार्ग जंक्शन ते कार्डिनल ग्रेसिअस मार्ग व सहार मार्ग जंक्शन येथे १५०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी आणि नवीन १२०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी (पार्ले आऊटलेट) या दोन मुख्य जलवाहिन्या जोडण्याचे व जुनी नादुरुस्त १२०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी काढून टाकण्याचे काम बुधवार, २९ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून ३० मे रोजी मध्यरात्री १ वाजेपर्यंत हाती घेण्यात येणार आहे. या १६ तासांदरम्यान अंधेरी व आसपासच्या परिसरात पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार असून काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. संबंधित काम पूर्ण झाल्यानंतर वेरावली जलाशय १, २, ३ ची पाण्याची पातळी सुधारेल व त्यामुळे अंधेरी, जोगेश्वरी आणि विलेपार्ले या भागांच्या पाणीपुरवठ्यामध्ये कायमस्वरुपी सुधारणा होणार आहे.

संबंधित परिसरातील नागरिकांनी पाणी जपून व काटकसरीने वापरावे. तसेच पाणीपुरवठा सुरळीत झाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून ४ ते ५ दिवस पाणी गाळून व उकळून वापरावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. १) के पूर्व विभाग – त्रिपाठी नगर, मुन्शी वसाहत, बस्तीवाला कंपाऊंड, कलेक्टर वसाहत मातोश्री क्लब, दुर्गा नगर (नियमित पाणीपुरवठा वेळ सकाळी ८ ते १०) सकाळी ८ ते सकाळी ९ वाजेदरम्यान पाणीपुरवठा होईल.



दुर्गा नगर, सारीपुत नगर (सकाळी १० ते दुपारी १२) पाणीपुरवठा बंद राहील. दत्त टेकडी, ओबेराय स्प्लेंडर, केलती पाडा, गणेश मंदिर परिसर जोगेश्वरी – विक्रोळी जोडरस्ता (जेव्हीएलआर) (सकाळी ९ ते ११), बांद्रेकरवाडी, फ्रान्सिसवाडी, मखरानीपाडा, सुभाष मार्ग, चाचानगर (सकाळी ११ ते दुपारी २), वांद्रे भूखंड, हरी नगर, शिवाजी नगर, पास्कल वसाहत, शंकरवाडी (दुपारी १.३० ते दुपारी ३.४०), विशाल सभागृह, वर्मा नगर, कामगार कल्याण, मांजरेकरवाडी, बिमा नगर, पंथकी बाग, तेली गल्ली, हाजी जुमान चाळ, कोल डोंगरी, जीवा महाले मार्ग, साई वाडी, जीवन विकास केंद्र, शिवाजी नगर, आर. के. सिंग मार्ग, निकोलसवाडी (रात्री ८ ते रात्री १०.३०) या परिसरातील पाणीपुरवठा बंद राहील.

## 'समृद्धी'वरून एक कोटी वाहनांची धाव 'एमएसआरडीसी'ला पथकरातून ७२५ कोटी

■ मुंबई: नितीन देवळेकर

नागपूर – मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पातील शिर्डी – भरवीरदरम्यानचा ८० किमीचा टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाल्यास, आज शनिवारी वर्ष पूर्ण झाले आहे. या एका वर्षात या महामार्गावरून एक कोटी वाहने धावली, तर पथकरापोटी ७२५ कोटी रुपयांचा महसूल मिळाला.



राज्याची राजधानी आणि उपराजधानीमधील अंतर कमी करण्यासाठी 'एमएसआरडीसी'ने ७०१ किमीच्या समृद्धी महामार्गाचे बांधकाम हाती घेतले आहे. त्यातील ६२५ किमीचा मार्ग सेवेत दाखल झाला आहे. नागपूर – शिर्डी टप्पा डिसेंबर २०२२ मध्ये तर शिर्डी – भरवीर टप्पा २५ मे २०२३ रोजी वाहतूक सेवेत दाखल झाला. तसेच भरवीर – इगतपूरीदरम्यानचा २५ किमीचा टप्पा मार्च २०२४ मध्ये वाहतूक सेवेत दाखल करण्यात आला आहे. अतिवेगवान प्रवासामुळे या महामार्गाला चांगला प्रतिसाद मिळाला. डिसेंबर २०२२ पासून २३ मे २०२४ पर्यंत या महामार्गावरून ९९ लाख ८० हजार वाहनांनी प्रवास केल्याची माहिती 'एमएसआरडीसी'तील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

## रुग्णालयाच्या नावाने मंजूर रक्तपेढी रुग्णालयात नसल्यास होणार परवाना रद्द, केंद्रीय आरोग्य सेवा विभागाचे निर्देश

■ मुंबई: सचिन कदम

मुंबईसह देशभरात रुग्णालयांतर्फे रक्तपेढ्या चालविण्यात येतात. मात्र या रक्तपेढ्या रुग्णालयाच्या इमारतीमध्ये किंवा परिसरात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या आरोग सेवा विभागाने अशा रक्तपेढ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा रक्तपेढ्यांच्या परवान्यांच्या नूतनीकरणाचे अर्ज विचारात घेऊ नये, असे निर्देश सर्व राज्यातील अन्न व औषध प्रशासनांना देण्यात आले आहेत. राज्यासह देशभरात अनेक सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये रक्तपेढ्या चालविल्या जातात. या रक्तपेढ्यांसाठी परवानगी घेताना संबंधित रुग्णालयाच्या नावाने अर्ज करण्यात येतात. रुग्णांना वेळेत रक्त पुरवठा व्हावा या उद्देशाने रुग्णालयातील रक्तपेढ्यांना मंजुरी देण्यात येते. मात्र अनेक रुग्णालयांच्या नावाने मंजुरी मिळवलेल्या



रक्तपेढ्या संबंधित रुग्णालय इमारतीमध्ये किंवा परिसरात नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या रक्तपेढ्यांकडून गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेता रुग्णालयाच्या नावाने चालविण्यात येणाऱ्या, परंतु रुग्णालयाच्या परिसरात नसलेल्या रक्तपेढ्यांचा परवाना रद्द करण्याचा, तसेच परवाना नूतनीकरणाला मंजुरी न देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

दर पाच वर्षांनी रक्तपेढ्यांना परवान्याचे नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. परवाना मंजूर करण्यासाठी किंवा नूतनीकरणासाठी औषध नियम, १९४५ च्या नियम १२२-जी अंतर्गत राज्य औषध विभाग आणि सीडीएससीओकडे अर्ज करावा लागतो. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार रुग्णालयाच्या नावाने असलेल्या, परंतु रुग्णालयाच्या आवारात नसलेल्या रक्तपेढीचे परवाना नूतनीकरण अर्ज विचारात घेऊ नये. असे अर्ज आल्यास ते आपल्याच स्तरावर रद्द करावे, अशा सूचनाही केंद्र सरकारच्या आरोग्य सेवा विभागाने राज्यातील सर्व अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत.

केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आम्ही पडताळणी सुरू केली आहे. अशी रक्तपेढी आढळल्यास त्यावर त्वरित कारवाई करण्यात येईल. मात्र महाराष्ट्रात अद्याप अशी एकही रक्तपेढी सापडली नसून, आमची पडताळणी प्रक्रिया सुरू आहे.

## पावसाळ्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष सज्ज, १ जून ते ३० नोव्हेंबरदरम्यान कक्ष कार्यान्वित राहणार

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारती, संक्रमण शिबीर आणि तेथे वास्तव्यास असलेल्या रहिवाशांच्या सोयीसाठी, तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ आवश्यक ती मदत मिळावी यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष स्थापन केला आहे. हा कक्ष १ जून ते ३० नोव्हेंबर या कालावधीत कार्यान्वित राहणार आहे. पावसाळ्यात मुंबईतील झोपु योजनेतील इमारती वा संक्रमक शिबीरातील इमारत कोसळण्याच्या वा आपत्कालीन घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा परिस्थितीत रहिवाशांना तात्काळ आवश्यक ती मदत मिळावी यासाठी आपत्कालीन कक्ष स्थापन करण्यात येतो. त्यानुसार यंदाही या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती झोपु प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी



दिली. झोपु प्राधिकरणाच्या मुख्यालयात १ जून ते ११ नोव्हेंबर दरम्यान हा कक्ष कार्यान्वित राहील. झोपु प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागात कार्यरत असलेले सहायक अभियंता आणि दुय्यम अभियंता यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## बेस्टची ॲप आधारित विमानतळ प्रीमियम सेवा बंद

■ मुंबई: संजीनी खाडे

बेस्ट उपक्रमाची ॲप आधारित मुंबई विमानतळ – कफ परेड, खारघर, गुंदवली प्रीमियम बस सेवा बंद करण्यात आली आहे. प्रवाशांच्या अल्प प्रतिसादामुळे या बस सेवा बंद करण्यात आल्या आहेत. या बस चलो ॲप कंपनीद्वारे चालवण्यात येत होत्या. त्यांनी या सेवा बंद झाल्याचे जाहीर केले आहे. तसेच याबाबत बेस्ट उपक्रमाकडून अधिकृत दुजोरा मिळाला नसला, तरी बेस्टमधील सूत्रांनी ही सेवा बंद झाल्याचे सांगितले.

मुंबईमधील वाढते प्रदूषण ही मोठी समस्या बनली असून, सर्वाधिक प्रदूषण वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे होत आहे. तसेच मुंबईत चारचाकी



वाहनाची संख्या वाढत असून वाहन संख्या कमी करण्याच्या दृष्टीने आणि पर्यावरणास अनुकूल वाहतूक सेवा सुरू राहावी यासाठी बेस्ट उपक्रमाने ॲप आधारित प्रीमियम बस सेवा सुरू केली. 'चलो मोबाइल' ॲपद्वारे या बसमधील आसन प्रवाशांना आरक्षित करता येत होते. मुंबई विमानतळ – कफ परेड, खारघर, ठाणे; गुंदवली – मुंबई विमानतळ, बोरिवली – मुंबई विमानतळ अशी प्रीमियम बस सेवा चालवण्यात येत होती. मात्र प्रवाशांच्या प्रतिसादाभावी या सेवा चालवणे परवडत नसल्याने त्या बंद करण्यात आल्या. दरम्यान, बेस्ट उपक्रमाकडून यासंदर्भात कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

## मुंबई पदवीधरवरून भाजप, शिंदे गटात चढाओढ; ठाकरे गटाकडून अनिल परब उमेदवार

■ मुंबई: राकेश गायकवाड

**मुंबई पदवीधर मतदारसंघ शिवसेनेच्या ताब्यात असल्याने शिंदे गटाने लढण्याची तयारी सुरू केली असतानाच भाजपचा या मतदारसंघावर डोळा असल्याने भाजप आणि शिंदे गटात या मतदारसंघावरून चढाओढ होण्याची चिन्हे आहेत. दुसरीकडे, शिवसेना ठाकरे गटाकडून माजी मंत्री अनिल परब यांना उमेदवारी दिली जाणार आहे.**

मुंबई पदवीधर हा मतदारसंघ पूर्वी भाजपचा बालेकिल्ला होता. पण शिवसेना नेते प्रमोद नवलकर यांनी पदवीधर मतदारसंघातील भाजपचे वर्चस्व मोडून काढले. त्यानंतर गेली ३० वर्षे हा मतदारसंघ शिवसेनेच्या ताब्यात आहे. गेल्या वेळी विलास पोतनीस हे शिवसेनेच्या वतीने निवडून आले होते. शिवसेनेतील फुटीनंतर गेल्या वेळी शिवसेनेने जिंकलेल्या मतदारसंघावर महायुतीत शिवसेना शिंदे गटाचा दावा असतो. यानुसार मुंबई पदवीधर मतदारसंघातून शिंदे गटाने लढण्याची तयारी सुरू केली आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघाचे दोनदा प्रतिनिधित्व केलेले माजी मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी शिंदे गटातून लढण्याची इच्छा पक्षाकडे व्यक्त केली आहे. पक्षातील फुटीनंतर डॉ. सावंत यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. शिवसेनेतील फुटीनंतर भाजपचा



मुंबई पदवीधर मतदारसंघावर डोळा आहे. 'तरुण भारत' या रा. स्व. संघ परिवाराशी संबंधित वृत्तपत्राचे मुंबईतील संपादक किरण शेलार यांनी पदवीधर मतदारसंघातील निवडणूक लढण्याच्या दृष्टीने तयारी केल्याचे सांगण्यात येते. या मतदारसंघात लढण्यासाठी भाजपने मोठ्या प्रमाणावर मतदारांची नोंदणी केली आहे. उमेदवारीबाबत शेलार यांनी काहीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास नकार दिला.

शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने माजी मंत्री व 'मातोश्री'चे विश्वासू अनिल परब यांना उमेदवारी निश्चित मानली जाते. परब यांची विधान परिषदेची मुदत येत्या जुलैमध्ये संपत आहे. शिवसेनेतील फुटीमुळे ठाकरे गटाकडे विधानसभेतून विधान परिषदेवर उमेदवार निवडून आणण्याकरिता पुरेशी मते नाहीत. यामुळे अनिल परब यांना पदवीधर मतदारसंघातून निवडून आणण्याची योजना आहे. या जागेसाठी युवासेनेचे वरुण सरदेसाई यांच्या नावाची चर्चा होती. पण बदलत्या परिस्थितीत परब यांना संधी दिली जाणार आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघात एक ते सव्वा लाख मतदार असतील. पहिल्या यादीत ९२ हजार मतदार पात्र आहेत. दुसरी यादी लवकरच प्रसिद्ध होईल. सव्वा लाखांच्या आसपास मतदारांची संख्या असेल. शिवसेना ठाकरे गटाकडून मोठ्या प्रमाणावर नोंदणी करण्यात आली आहे.

# डोंबिवली एमआयडीसीला भंगार गोदामांचा विळखा: पोलीस आणि पालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

■ कल्याण: आकाश कांबळे

**मुंबईच्या विविध भागातून, कुर्ला परिसरातून काही वर्षापूर्वी हटविलेले बहुतांशी बडे भंगार विक्रेते डोंबिवली, शिळफाटा, दहिसर-मोरी परिसरात येऊन स्थिरावले आहेत. २७ गाव हद्दीतील गोळवली, सोनारपाडा, पिसवली, व्दारली, उंबार्ली हा भंगार गोदामांचा पट्टा म्हणून ओळखला जातो.**

या भंगारा गोदामांमुळे यापूर्वी या भागात आगीच्या घटना घडल्या आहेत. डोंबिवली एमआयडीसी परिसरात स्थानिकांच्या मदतीने वन, सरकारी, पालिकेच्या आरक्षित भूखंडांवर ही बेकायदा गोदामे सुरू करण्यात आली आहेत. डोंबिवली परिसरात भंगार संकलकांकडून जमा होणारे भंगार या बड्या भंगार विक्रेत्यांना विकले जाते. याशिवाय जुन्या कंपन्या, इमारतींमधील भंगार हे विक्रेते विकत घेतात. एमआयडीसी परिसरात तांब्याच्या तारा, लोखंड आणि उत्पादन प्रक्रियेशी महत्वाच्या सामानांची चोरट्यांनी चोरी केली की ते चोरीचे साहित्य भंगार विक्रेते कमी किमतीला विकत घेऊन त्याची विल्हेवाट लावतात. या भंगार विक्रेत्यांना स्थानिक पोलीस, शासकीय, कल्याण डोंबिवली पालिका यंत्रणा यांचा पाठिंबा आहे. दर महिन्याला स्थानिक पोलिसांची या भागात एक फेरा असतो. मानपाडा पोलीस ठाण्यात या भंगार गोदामांमुळे वरिष्ठ अधिकाऱ्याचे पद मिळवण्यासाठी मोठी चढाओढ लागते, अशी पोलीस दलात चर्चा आहे.



आपल्या हद्दीत बेकायदा भंगार विक्रेत्यांवर कारवाई करण्याचे अधिकारी स्थानिक कल्याण डोंबिवली पालिकेचे अधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी यांना आहेत. या यंत्रणा काही दुर्घटना घडल्याशिवाय कधीच भंगार विक्रेत्यांवर कारवाई करत नाहीत. गेल्या दोन महिन्यापूर्वी गोळवली भागात दुपारच्या वेळेत भंगार गोदामांना भीषण आग लागून परिसरातील दुकाने बेचिराख झाली होती. २७ गाव भागातील बेकायदा भंगार विक्रीची दुकाने ही कल्याण डोंबिवली शहरांना लागलेली किड आहे. ७ डिसेंबर २०१३ रोजी शिळफाटा रस्त्यावरील गोळवली भागातील गायकर कम्पाऊंडमध्ये एका भंगार दुकाना बाहेरील बॉयलरची तोडफोड करताना भीषण स्फोट होऊन तीन कामगार ठार आणि लगतची घरे आगीने प्रभावीत झाली होती. ९ डिसेंबर २०२० रोजी सोनारपाडा येथील एका भंगार गोदामाला आग लागून ४० गाळे खाक झाले होते. शिळफाटा रस्त्यावरील दहिसर-मोरी परिसरात मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर भंगार विक्रीची भव्य दुकाने उभी आहेत. तरीही महामार्ग प्राधिकरण या दुकानांवर कारवाई करत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या सर्व बेकायदा भंगार दुकानांना महावितरणची चोरून वीज वापरल्याच्या तक्रारी आहेत. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी आता प्रभावीपणे सक्रिय होऊन २७ गाव परिसरातील बेकायदा भंगार गोदामांवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कल्याण, डोंबिवलीसह २७ गाव हद्दीत सरकारी, वन जमिनीवर सर्व बडे भंगार विक्रेते हे मुंबईतून हटविल्यानंतर या भागात आले आहेत. चोऱ्यांतून मिळणारे सामान घेऊन त्यांची विक्री करणे हे यांचे उद्योग आहेत.

# ठाण्यात केवळ ६० टक्के नालेसफाई

■ ठाणे: विशेष प्रतिनिधी

ठाणे महापालिका क्षेत्रात नालेसफाईची कामे केवळ ६० टक्केच पूर्ण झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात नाले तुंबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, नाले सफाईची कामे वेगाने सुरू असून ३१ मेपर्यंत सगळे काम पूर्ण होतील असा दावा ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केला आहे. महापालिका आयुक्त राव यांनी नालेसफाईच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. अनेक ठिकाणी नालेसफाई झाली नाही. नालेसफाईची कामे उशिराने सुरू झाल्याने केवळ ६० टक्केच नालेसफाई झाल्याचे समोर आले आहे. येत्या काही दिवसांवर पावसाळा आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी संपूर्ण नालेसफाई झाली नाही तर, नाले तुंबून त्याचा परिणाम नागरिकांना



सहन करावा लागणार आहे. आयुक्त राव यांनी सर्वप्रथम, कळवा येथील महात्मा फुले नगर येथील नाल्यातील गाळ काढण्याचा कामाचा आढावा घेतला. रस्त्यावर आलेला गाळ लवकर हटवून रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी मोकळा करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या. वस्तीमधील नाल्यात टाकला जाणारा कचरा रोखण्यासाठी या नाल्यांवर जाळ्या बसवाव्यात. त्यात साठणारा कचरा नियमितपणे उचलला जावा. नाल्यात वारंवार पडणारा कचरा साठून पावसाळ्यापूर्वी होणारी कसरत आणि कोट्यवधींचा खर्च कमी होईल. त्यादृष्टीने पावले उचलण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. नाल्यात कचरा टाकू नये यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी. तसेच, स्थानिक स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक यांची मदत घ्यावी, असेही राव यांनी सांगितले. उथळसर प्रभाग समितीतील ऋतू पार्क येथील नालेसफाईचे काम राव यांनी पाहिले. कापूरबावडी, थिराणी, वागळे इस्टेटमधील आनंद इंडस्ट्रीज येथील नाला, सुपरमॅक्स कंपनी लगतचा नाला, परब वाडी येथील नाल्यांच्या सफाईची देखील आयुक्त राव यांनी पाहणी केली.

# यंदाच्या पावसाळ्यात घोडबंदर कोंडीत

■ ठाणे: तृप्ती गोरे

ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या मार्गापैकी एक असलेल्या घोडबंदर मार्गावर गेल्याकाही दिवसांपासून रस्ता रुंदीकरण, भुयारी गटारांची निर्मिती आणि डांबरी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण कामे सुरू झाली आहेत. या कामांमुळे घोडबंदर मार्गावरील सेवा रस्ते, अंतर्गत रस्ते विविध प्राधिकरणांकडून खोदण्यात आले आहेत. त्याचा परिणाम घोडबंदर मार्गावरील वाहतूक व्यवस्थेवर बसत आहे. येत्या काही दिवसांत पावसाची शक्यता आहे. रस्ते खोदकामे करण्यात आल्याने घोडबंदरमधील नागरिकांना पावसाळ्यात मोठ्या कोंडीच्या सामन्याला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

घोडबंदर मार्ग परिसरात कापूरबावडी ते गायमुखपर्यंत लोकवस्ती वाढली आहे. मुंबईपासून ठाणे शहर तुलनेने



जवळ असल्याने या भागात गृहखरेदी करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. तसेच गुजरात येथून उरण जेएनपीटी, भिवंडी आणि नाशिक भागात वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूकही घोडबंदर मार्गावरून होत असते. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या मार्गापैकी हा मार्ग महत्त्वाचा आहे. असे असले तरी विविध प्राधिकरणांमार्फत येथे कामे सुरू आहेत. पाच वर्षाहून अधिक काळापासून या मार्गावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून मेट्रो मार्गिकेच्या मेट्रो चार या वडाळा-घाटकोपर-कासारवडवली मार्गिकेचे काम सुरू आहे. या मार्गिकेच्या निर्माणासाठी घोडबंदर मार्गावर ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. तसेच खोदकामाच्या भोवती पत्रे उभारण्यात आले आहेत. त्यामुळे मुख्य मार्गिका अरुंद झाल्या आहेत. त्याचा परिणाम नागरिकांना सहन करावा लागत आहे. असे असतानाच, घोडबंदर मार्गिकेच्या रुंदीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, येथील सेवा रस्ते मुख्य मार्गिकेला जोडले जाणार आहेत.

# गायमुख ते वसई दरम्यान वाहतुक कोंडी; १० ते १५ मिनिटांच्या अंतरासाठी सुमारे पाऊण तास

■ ठाणे: माधव अलवा

घोडबंदर घाट रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामामुळे शनिवारी देखील नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.



एकेरी पद्धतीने सुरु असलेल्या वाहतूकीमुळे वसई – विरार कडून ठाण्याकडे येणाऱ्या नागरिकांचे शनिवारी हाल झाले. या कोंडीमुळे नागरिकांना १५ ते २० मिनिटाच्या अंतरासाठी अर्धा ते पाऊण तास लागत होता. घोडबंदर मार्ग हा वाहतुकीसाठी महत्त्वाचा मानला जातो. या मार्गावर मोठ्या प्रमाणात जड-अवजड वाहनांची वाहतूक सुरु असते.

हा मार्ग अरुंद असल्यामुळे याठिकाणी वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी रोखण्यासाठी घोडबंदर घाट रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शुक्रवारपासून हाती घेण्यात आले. या कामामुळे येथील वाहतूक एकेरी पद्धतीने सोडली जात आहे. त्याचा, परिणाम वाहतूकीवर झाला असून कोंडीत भर पडली आहे.

# धारण तलाव स्वच्छतेचा अडसर कायम, प्रशासन एमसीझेडएमएच्या परवानगीच्या प्रतीक्षेत

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

नवी मुंबई शहरातील धारण तलावांची स्वच्छता गेल्या कित्येक वर्षापासून करण्यात आलेली नाही. धारण तलावात आलेल्या कांदळवनामुळे गाळ काढण्यात अडचणी येत आहेत. पावसाळ्यात सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली होती. मात्र आता त्यात गाळ साचलेल्याने पावसाळ्यात पाणी साचते. कांदळवनातील गाळ काढण्यासाठी महापालिकेला एमसीझेडएमएची परवानगी अद्याप मिळाली नाही. त्यामुळे धारण तलावांमधून पाण्याचा योग्य निचरा व्हावा म्हणून पालिकेतर्फे सीबीडी येथील पंप हाऊससमोरील गाळ काढण्यास सुरुवात केली आहे.

नवी मुंबईत शहर हे खाडीकिनारी वसले आहे. त्यामुळे खाडीत येणाऱ्या भरतीचे पाणी शहरात येऊ नये व शहरातील सांडपाण्याचा निचरा खाडीत व्हावा या हेतूने सिडकोने नवी मुंबईतील विविध भागांत



धारण तलाव तयार केले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ११ धारण तलाव आणि स्टॉर्म वॉटर पंप हाऊसला लागून असलेले दोन धारण तलाव असे एकूण १३ धारण तलाव आहेत. या तलावांची गेल्या १९ वर्षापासून स्वच्छता करण्यात आलेली नाही. आजघडीला या धारण तलावांची दुरवस्था झाली आहे. शहरातील सिडकोकालीन सर्वच धारण तलाव मागील अनेक वर्षे साफ न केल्याने ते गाळाने व खारफुटीने भरले असल्याने धारण तलावांची स्वच्छता रखडली आहे.

धारण तलावात असलेल्या खारफुटी कांदळवनामुळे त्यातील गाळ काढण्यास अडचणी येत आहेत. न्यायालय आणि एमसीझेडएमएची परवानगी प्रलंबित आहे. त्यामुळे संपूर्ण धारण तलावाची स्वच्छता करण्यात अडचण येत आहे. पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून कांदळवनाला धक्का न लावता पंप हाऊससमोरील गाळ काढण्यात येत आहे.

# स्ट्रॉंग रुम भागात पुन्हा ठेकेदाराकडून खोदकाम, विद्युत वाहिनी तोडल्याने महावितरणकडून ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल

■ ठाणे: विशेष प्रतिनिधी

घोडबंदर येथील कासारवडवली भागात एका शाळेमध्ये स्ट्रॉंग रुम तयार करून येथे मतदान यंत्रणा ठेवण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे येथील स्ट्रॉंग रुममध्ये आहे. येथील विद्युत पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली भागात कोणत्याही प्रकारचे खोदकाम करू नये असे आदेश ठेकेदारांना दिले आहेत. असे असतानाही बुधवारी एमएमआरडीएच्या ठेकेदाराने रस्ते खोदकाम करताना महावितरणची विद्युत वाहिनी तोडली. ही वाहिनी स्ट्रॉंग रुमला विद्युत पुरवठा करणारी पर्यायी विद्युत वाहिनी होती. सुदैवाने स्ट्रॉंग रुममधील विद्युत पुरवठा सुरळीत होता. या गंभीर प्रकारानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराविरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच महापालिकेच्या ठेकेदारानेही अशाचप्रकारे विद्युत वाहिनी तोडली होती. असे असतानाही पुन्हा विद्युत वाहिनी तोडण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) मुख्य रस्ता सेवा रस्त्यामध्ये सामाविष्ट करण्याचे कार्य सुरू आहे. कासारवडवली येथील कावेसर




परिसरातील या कामाचा ठेका देव इंजिनिअर्स प्रा. लि. या कंपनीला देण्यात आला आहे. बुधवारी दुपारी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी खोदकाम करताना येथील सेवा रस्त्याखालून गेलेली विद्युत वाहिनी तोडली. या कामामुळे परिसरातील विद्युत पुरवठा खंडीत झाला. याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळाल्यानंतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. ही विद्युत वाहिनी स्ट्रॉंग रुमला विद्युत पुरवठा करण्यासाठी पर्यायी व्यवस्था होती. स्ट्रॉंग रुमला विद्युत पुरवठा करणारी मुख्य वाहिनी सुस्थितीत असल्याने स्ट्रॉंग रुमच्या विद्युत पुरवठ्यावर परिणाम झाला नाही. हे प्रकरण गांभीर्याने घेऊन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कल्याण डोंबिवली पालिकेची बेकायदा होर्डिंगजवर कारवाई; लोखंडी सांगाडे कटरच्या साहाय्याने भुईसपाट

■ कल्याण: आकाश कांबळे

कल्याण डोंबिवली पालिकेच्या परवानग्या न घेता पालिका हद्दीत उभारण्यात आलेल्या बेकायदा होर्डिंगजचे लोखंडी सांगाडे तोडण्याची जोरदार मोहीम प्रभाग स्तरावर साहाय्यक आयुक्तांच्या उपस्थितीत आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून सुरू करण्यात आली आहे. पाऊस सुरू होण्यापूर्वी ३१ मेपर्यंत पालिका हद्दीतील सर्व बेकायदा होर्डिंग्ज तोडून टाकण्याचे आयुक्त डॉ. जाखड यांचे आदेश आहेत. घाटकोपर येथील होर्डिंग्ज दुर्घटनेनंतर कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पालिका हद्दीत परवानगीधारक होर्डिंग्ज आणि पालिकेच्या परवानग्या न घेता उभारण्यात आलेली लोखंडी सांगाड्याची होर्डिंग्ज यांची तपासणी करण्याचे आदेश प्रभाग साहाय्यक आयुक्तांना दिले आहेत. तसेच, होर्डिंग्ज लावणाऱ्या जाहिरात कंपन्यांनी आपले होर्डिंग्जविषयक संरचनात्मक प्रमाणपत्र पालिकेच्या मालमत्ता विभागाचे उपायुक्त धर्येशील जाधव यांनी पालिकेला सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

साहाय्यक आयुक्तांनी प्रभागस्तरावर केलेल्या सर्वेक्षणा दरम्यान जी होर्डिंग्ज पालिकेच्या मालमत्ता विभागाच्या परवानग्या न घेता उभारण्यात आली आहेत. ती तातडीने



आयुक्त जाखड, उपायुक्त जाधव यांच्या आदेशावरून कटरच्या साहाय्याने कापून भुईसपाट केली जात आहेत. आय प्रभाग हद्दीत व्दारली येथे मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर एका जाहिरात कंपनीने २० बाय ३० भव्य लोखंडी सांगाड्याचे होर्डिंग्ज उभारले होते. साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांना हे होर्डिंग्ज बेकायदा असल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने या होर्डिंग्चे लोखंडी सांगाडे कापून ते जमीनदोस्त केले. शिळफाटा रस्त्यावरील काटई नाका, गायकर कम्पाऊंड भागात १० बाय १५ आकाराची दोन बेकायदा होर्डिंग्ज जाहिरातदारांनी लावली होती. ही होर्डिंग्ज ई प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने काढून टाकली. कल्याण पूर्वेतील ड प्रभाग हद्दीतील चक्कीनाका भागातील बेकायदा होर्डिंग्ज या प्रभागाचे साहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांनी तोडकाम पथकाच्या उपस्थितीत तोडून टाकले. या आक्रमक कारवाईमुळे कल्याण डोंबिवली पालिका परिसरातील मुख्य वर्दळीचे रस्ते, इमारतींवर बेकायदा होर्डिंग्ज लावणाऱ्या राजकीय मंडळी, जाहिरात कंपन्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. कल्याण डोंबिवली पालिकेतील शिळफाटा आणि इतर वर्दळीच्या चौक, रस्त्यांवर, तसेच, ठाणे पालिका हद्दीत उभारण्यात येत असलेली बहुतांशी बेकायदा होर्डिंग्ज ठाण्यातील एका बड्या लोकप्रतिनिधीच्या सल्लागाराच्या इशाऱ्यावरून लावली जात असल्याच्या वाढत्या तक्रारी आहेत.

# सिडकोच्या ऑनलाईन लिलावामध्ये घोटाळ्याची साशंकता!

■ पनवेल: दिगंबर जाधव

सिडको महामंडळाने नूकतीच बामनडोंगरी येथील दूकानांसाठी ऑनलाईन बोलीपद्धतीने लिलाव आयोजित केला होता. मात्र लिलाव अंतिम टप्यात असताना सिडकोचे संकेतस्थळावर काहीच हालचाली होत नसल्याने गुंतवणूकदारांनी संताप व्यक्त करत लिलावात काही काळंबेरं असल्याचा आरोप केला आहे. याबाबत सिडको मंडळाने स्पष्टीकरण देऊन काही काळांसाठी तांत्रिक अडचणी असल्याने ही अडचण झाल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. यानंतर गुंतवणूकदारांनी बामनडोंगरी येथील दूकानांचा लिलावाचा कार्यक्रम पुन्हा आयोजित करावा अशी मागणी समाजमाध्यमांवर केली आहे. सिडको मंडळातील महागृहनिर्माणाची आणि दूकानांची सोडत ऑनलाईन पद्धतीने होते.




दक्षिण नवी मुंबईत विक्रीसाठी अजूनही सिडको महामंडळाला वाव असल्याने या परिसरातील घर, भूखंड आणि दूकाने यांच्या लिलावातून मिळणा-या उत्पन्नामुळे सिडकोच्या तिजोरीत भरभराट आहे. सिडको मंडळाने यापूर्वीही भूखंड लिलाव आणि महागृहनिर्माणातील घर व दूकानांच्या सोडतीची प्रक्रिया पारदर्शक असल्याचा दावा केला आहे. नूकत्याच घडलेल्या बामणडोंगरी येथील दूकानांच्या लिलावामध्ये सहभागी झालेल्या गुंतवणूकदारांनी सिडकोच्या कार्यप्रणालीविषयी साशंकता व्यक्त करत बोली लावताना ऐनवेळेला बंद पडलेल्या ऑनलाईनपद्धतीमुळे लिलावात सामिल होता आले नसल्याचा आरोप करत ही प्रक्रिया राबविणा-या कंपनीला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी समाजमाध्यमांवरुन केली आहे.

# शिक्षकांच्या गणवेशासाठी मतदान, नवी मुंबई महापालिका शिक्षकांची प्रक्रियेला सुरुवात

■ नवी मुंबई: भावना जैन

राज्य शासनाच्या १५ मार्चच्या शिक्षकांच्या गणवेशाबाबतच्या परिपत्रकानुसार नवी मुंबईतही शिक्षकांचा गणवेश निश्चित करण्यासाठी ऑनलाइन लिंक पाठवून शिक्षकांच्या मतदानाचा कौल घेतला जाणार आहे. त्याची सुरुवात नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने केली असून ४६० शिक्षकांनी लिंकद्वारे गणवेशाबाबत मतदानाचा कौल दिला आहे.

शिक्षकांचा संबंध हा भावी पिढीशी येत असून त्यांच्या गणवेशाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करीत असताना शिक्षकांनी वेशभूषेबाबत जागरूक राहून आपली वेशभूषा ही आपल्या पदास अनुरूप असावी असे पत्रकात म्हटले असून विद्यार्थी हे अनुकरणप्रिय असल्याने शिक्षक व शिक्षिकांना गणवेशाबाबत योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांच्या गणवेशाची बाब विचारात घेता गणवेश कसा असावा त्याचा रंग कसा असावा याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

नवी मुंबई महापालिकेनेही आपल्या अखत्यारीत येणाऱ्या पालिकेच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा



गणवेश निश्चित केल्याप्रमाणे त्याचा रंगनिश्चितीसाठी लिंकद्वारे मतदानाचा कौल घेतला जात आहे. त्यात महिला शिक्षकांनी साडी अथवा सलवार, चुडीदार, कुर्ता व दुपट्टा तर पुरुष शिक्षकांनी जीन्स, टी शर्ट न वापरता पॅन्ट-शर्ट असा पेहराव करावा तसेच चित्र-विचित्र नक्षीदार कपडे परिधान करून नयेत, असे शिक्षण विभागाच्या आदेशात म्हटले आहे. शिक्षकांनी कोणत्या रंगाचा पेहराव करावा हे त्या शाळेने निश्चित करावे असे सांगितले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतील शिक्षण विभागाने महिला शिक्षकांसाठीची साडी व कुर्ती तसेच पुरुष शिक्षकांच्या शर्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यासाठी संबंधित शिक्षकांना लिंक पाठवली आहे. त्यानुसार लिंकद्वारे साडी किंवा कुर्ती आणि शर्ट यांचा रंग निश्चित झाल्यावर त्या आधारे स्त्री शिक्षकांसाठीचा ब्लाऊज व सलवार तसेच पुरुष शिक्षकांच्या पॅन्टचा रंग निश्चित करण्यासाठी मतदान घेण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेतील सर्व शिक्षकांच्या मोबाइलवर फॉर्मची लिंक पाठवण्यात आली असून हा फॉर्म तात्काळ भरून देण्याचे आवाहन देण्यात आले आहे.

# बरे होऊनही एखाद्या व्यक्तीला रुग्णालयातच ठेवणे दुर्दैवी, उच्च न्यायालयाची टिप्पणी

■ **मुंबई: संजीनी खाडे**

एखादी व्यक्ती पूर्णत: बरी होऊनही तिला रुग्णालयातच ठेवणे अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची टिप्पणी उच्च न्यायालयाने केली. ठाणेस्थित मनोरुग्णालयात दाखल महिलेच्या बहिणीने दाखल केलेल्या याचिकेच्या निमित्ताने न्यायालयाने ही टिप्पणी केली. तसेच, पतीच्या अनुपस्थितीमुळे ही महिला मनोरुग्णालयातच दाखल असल्याने तिला घरी सोडण्याची प्रक्रिया पूर्ण करता यावी यासाठी पतीला रुग्णालयात उपस्थित राहण्याचे आदेश न्यायालयाने दिले. त्याचवेळी, सुश्रुषा करण्यासाठी या महिलेला आपल्यासह नेण्याची परवानगी न्यायालयाने याचिकाकर्तीला दिली.

आपली बहीण एकदम ठणठणीत असून तिला चुकीच्या पद्धतीने मनोरुग्णालयात दाखल करण्यात आल्याचा दावा करून याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, बहिणीला न्यायालयात उपस्थित करण्याचे आदेश देण्याची मागणी केली होती. बहिणीला आपल्यासह नेऊ देण्याची मागणीही याचिकाकर्तीने केली होती. न्यायमूर्ती नितीन बोरकर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी, न्यायालयाने उपरोक्त टिप्पणी करून महिलेच्या पतीला रुग्णालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले व याचिकाकर्तीली तिला आपल्यासह नेण्यास परवानगी दिली. याचिकाकर्तीची बहीण बरी झाली असून तिला



घरी सोडण्याबाबतचे पत्र रुग्णालय प्रशासनाने दिले आहे. परंतु, रुग्णालयात दाखल करणाऱ्या व्यक्तीच्या उपस्थितीतच महिलेला घरी सोडले जाईल, असे सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी न्यायालयाला सांगितले. त्याची दखल घेऊन न्यायालयाने महिलेला घरी सोडते वेळी तिच्या पतीला रुग्णालयात उपस्थित राहावे, असे आदेश दिले. तसेच, पोलिसांनीही या सगळ्या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. रुग्णालय प्रशासनाने महिलेच्या सध्याच्या मानसिक स्थितीबाबत पती आणि बहिणीला माहिती द्यावी व तिची काळजी घेण्याबाबतच सूचना करावी, असेही न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. याचिकेनुसार, महिलेचे २००९ मध्ये लग्न झाले. सर्व सुरळीत असताना पतीने तिला त्रास देण्यास सुरुवात केली. महिलेने ऑक्टोबर २०२२ मध्ये पती आणि आणि त्याच्या कुटुंबीयांविरोधात पोलिसांत तक्रार केली. आपण ५ मे रोजी बहिणीची भेट घेतली तेव्हा ती पूर्णपणे बरी होती. परंतु, ९ मे रोजी तिला मनोरुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे आपल्याला समजले. त्यामुळे, दुसऱ्या दिवशी रुग्णालयात तिला भेटण्यासाठी गेलो. मात्र, रुग्णालयाच्या धोरणाचा भाग म्हणून आपल्याला भेट नाकारण्यात आली. आपण या प्रकरणी स्थानिक पोलिसांसह माहीम पोलिसांकडेही मदत मागितली. त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर, बहिणीची १५ मे रोजी अखेर भेट झाली.

# बीडमध्ये पराभवाच्या भीतीने फेरमतदानाची मागणी; सुनील तटकरे यांची टीका

■ **मुंबई: नितीन देवळेकर**

विरोधकांना लोकसभा निवडणुकीत राज्यात पराभव होणार याची खात्री आहे. त्यामुळे मतदान केंद्र ताब्यात घेऊन बोगस मतदान झाल्याचा कांगावा विरोधी पक्षांमधील नेते करीत आहेत. त्यांनी मतदानास पंधरा दिवस उलटल्यानंतर फेरमतदानाची मागणी करणे हास्यास्पद आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर केली. पवार आणि सुळे यांना आता काही कामच उरले नसल्याने ते आरोप करीत असल्याचे तटकरे यांनी नमूद केले. बीड व अन्य काही ठिकाणी बोगस मतदानाची तक्रार करीत फेरमतदानाची मागणी शरद पवार व सुळे यांनी केली आहे. यासंदर्भात बोलताना तटकरे म्हणाले की, फेरमतदानाची मागणी मतदानाच्या दिवशी सायंकाळी किंवा दुसऱ्या



दिवशी होऊ शकते. पण १५-२० दिवसांनंतर मागणी करण्यात आली, याचा अर्थ विरोधकांना निवडणुकीचे निकाल काय लागणार आहेत, यांचा अंदाज आलेला आहे. हल्ली कुठल्याही ठिकाणच्या खोट्या ध्वनिचित्रफिती समाजमाध्यमांवरून पसरविल्या जातात आणि बोगस मतदान केल्याचे आरोप होतात. पण, त्यात काही तथ्य नसते.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबईत गरवारे क्लब हाऊसमध्ये सोमवारी सकाळी ११ ते १ या वेळेत बैठक आहे. बैठकीला खासदार, मंत्री, आमदार, पक्षाचे लोकसभा उमेदवार, सर्व जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. पक्षाचा १० जून रोजी वर्धापनदिन साजरा होणार असून त्यानिमित्त मुंबई, दिल्लीमध्ये कार्यक्रम होतील. या बैठकीत बड्या नेत्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होणार आहेत. राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारे हे प्रवेश असतील, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

# मुख्य आरोपी भावेश भिंडेला न्यायालयाचा दणका, पोलीस कोठडीत २९ मे पर्यंत वाढ

■ **मुंबई: प्रथमेश चव्हाण**

घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेतील प्रमुख आरोपी भावेश भिंडे याला न्यायालयाने कोणताही दिलासा दिलेला नाही. न्यायालयाने भावेश भिंडेची कोठडी २९ मे पर्यंत वाढवली आहे. दोन आठवड्यांपूर्वी मुंबईतल्या घाटकोपरमध्ये एक होर्डिंग कोसळून १७ जणांचा बळी गेला होता. या दुर्दैवी घटनेनंतर मुंबई पोलिसांनी त्याला राजस्थानच्या उदयपूरमधून अटक केली होती. भावेश भिंडेंची जाहिरात कंपनी दुर्घटनाग्रस्त होर्डिंगचं संचालन करत होती. होर्डिंग दुर्घटनेनंतर भिंडे फरार झाला होता. मात्र पोलिसांनी उदयपूरपर्यंत त्याचा माग काढला आणि त्याच्या मुसक्या आवळून न्यायालयासमोर हजर केलं.मुंबईत १३ मे रोजी वादळी वाऱ्यामुळे घाटकोपरच्या पूर्व द्रुतगती मार्गावर लावलेले होर्डिंग कोसळले होते. या दुर्घटनेत १७ जणांचा बळी गेला होता. इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने हे होर्डिंग लावले होते. भावेश भिंडे हा त्या कंपनीचा संचालक असल्याने त्याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.





या दुर्घटनेनंतर पोलीस भावेश भिंडेचा शोध घेत होते. पोलिसांनी त्याच्या मुलूंड येथील राहत्या घरी जाऊन त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांची धाड पडण्यापूर्वीच तो फरार झाला. पोलिसांनी त्याचं शेवटचं लोकेशन शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा समजलं की तो लोणावळ्यात आहे. त्यानुसार पोलीस लोणावळ्याला गेले. मात्र तो तिथूनही फरार झाला. त्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने १६ मे रोजी त्याला राजस्थानच्या उदयपूरमधून अटक केली आणि मुंबईत आणलं. भावेश भिंडे याच्याविरोधात आतापर्यंत २३ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय त्याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हादेखील दाखल आहे. याचवर्षी २४ जानेवारी रोजी मुंलुंड पोलीस ठाण्यात भावेशविरोधात बलात्कार आणि विनयभंगाची तक्रार दाखल करण्यात आली होती. याप्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्याचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. भिंडे हा १९९८ पासून जाहिरातीच्या व्यवसायात असून त्याला आतापर्यंत १०० हून अधिक वेळा महापालिकेने दंड ठोठावला आहे. जाहिरात फलक लावल्याप्रकरणी या दंडात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

# एड्स रोखण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एआरटी केंद्र सुरू करा

■ **मुंबई: माधव अलवा**

एड्स नियंत्रणात आणण्यासाठी देशातील प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये अँटी-रेट्रोव्हायरल थेरपी (एआरटी) केंद्र आवश्यक असल्याचे राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या धर्तीवर केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना त्यांच्याकडील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एआरटी केंद्र सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एआरटी केंद्र सुरू केल्यास एड्सग्रस्त रुग्णांना उपचार मिळणे सुलभ होणार आहे.

राष्ट्रीय एड्स आणि एसटीडी नियंत्रण कार्यक्रमांतर्गत (एनएसीपी) २०३० पर्यंत सार्वजनिक आरोग्या समोर मोठे आव्हान असलेल्या एड्सला आवाक्यात आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मात्र त्यासाठी एचआयव्हीग्रस्त रुग्णांना सहज व सुलभ पद्धतीने उपचार मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी एआरटी सेवांचे विकेंद्रीकरण केल्यास रुग्णांना चांगल्या दर्जाचे उपचार पुरविणे सोपे होणार आहे. राष्ट्रीय एड्स आणि एसटीडी नियंत्रण कार्यक्रमांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये आणि त्यांच्यामधील एआरटी केंद्र पूरक भूमिका बजावतात. ही बाब लक्षात घेता राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात एआरटी केंद्राची सुविधा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र अद्यापपर्यंत अनेक महाविद्यालयांमध्ये एआरटी केंद्र नसल्याने एड्सग्रस्त रुग्णांना उपचार पुरविण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देशातील प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये



एआरटी केंद्र सुरू करण्याचे आदेश सर्व राज्यांना दिले आहेत. एआरटी केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयाने एआरटी केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव राज्य एड्स नियंत्रण संस्थेकडे पाठवावा. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालयाची मूल्यांकन तपासणी करण्यात येणार आहे. मूल्याकंनाचा अहवाल सादर झाल्यानंतर राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेद्वारे अंतिम मान्यता देण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेतर्फे वैद्यकीय महाविद्यालयात पायाभूत सुविधांची व्यवस्था आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून सांगण्यात आले.

# उच्चभ्रू पिंपळे सौदागरमध्ये स्पा सेंटरवर छापा; दोन महिलांची सुटका, सुरू होता वेश्याव्यवसाय

■ **पिंपरी-चिंचवड: शकिल शेख**

पिंपरी- चिंचवडमध्ये स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या स्पा सेंटरचा अनैतिक



मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाने पर्दाफाश केला आहे. उच्चभ्रू असलेल्या पिंपळे सौदागर येथील शिवार चौकात स्पा सेंटर सुरू होते. वेश्याव्यवसाच्या जाळ्यातून दोन महिलांची सुटका करण्यात आली आहे. अक्षय धनराज पाटील (स्पा मॅनेजर), रोहन समुद्र (स्पा मालक) आणि भूषण पाटील (स्पा मालक) यांचा वाकड पोलीस शोध घेत आहेत. या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात भा.द.वी कलम ३७० (३),३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्पा सेंटर च्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरु असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांना मिळाली. पोलिसांनी पिंपळे सौदागर येथील ॲपल ब्युटी सल्यून ॲंड स्पा सेंटर येथे जाऊन खरच त्या ठिकाणी स्पा च्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालतो का? याची खात्री केली.

# जळगाव जिल्ह्यात वादळी वाऱ्यांमुळे केळीबागा आडव्या, मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान

■ **जळगाव: विशाल कारंडे**

शहरासह जिल्ह्यातील तापमान ४५ अंशांवर पोहोचले असताना, शनिवारी रात्री वातावरणात अचानक बदल होऊन वादळी वारे आले. वादळी वाऱ्यामुळे रावेरसह मुक्ताईनगर, बोदवड या तालुक्यांत केळीबागा जमीनदोस्त झाल्या. त्यामुळे अगोदरच विविध समस्यांनी त्रस्त केळी उत्पादकांना आर्थिक फटका बसला आहे. गेल्या आठ दिवसांपासून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत होती. मात्र, शनिवारी रात्री आठच्या सुमारास शहरासह जिल्ह्यातील वातावरणात अचानक बदल होऊन वादळी वाऱ्यामुळे शहरातील सम्राट कॉलनीसह पिंप्राळा व इतर ठिकाणी झाडे उन्मळून पडली. घराघरांत धुळीचे लोट आले. धुळीतून मार्ग काढताना दुचाकीस्वारांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागली. वादळी वाऱ्यांमुळे झाडांच्या फांद्या वीजवाहिन्यांवर पडल्यामुळे निम्म्यापेक्षा अधिक शहराचा वीजपुरवठा रात्री उशिरापर्यंत खंडित होता. शिवाजीनगरसह गेंदालाल मिल परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे परिसरातील रहिवाशांनी थेट वीज उपकेंद्रावर धडक दिली होती. शहरातील वाघूर पंपगृहाचाही वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे महापालिकेच्या पाणीपुरवठा



वेळापत्रकाच्या नियोजनानुसार जळगावकरांना पाणीपुरवठाही एक दिवस उशिरा होणार आहे.

जिल्ह्यातील केळी उत्पादक अगोदरच विविध समस्यांनी चिंताग्रस्त झालेला असताना शनिवारी रात्री झालेल्या वादळी वाऱ्यामुळे केळीचे मोठे नुकसान झाले आहे. रावेरसह मुक्ताईनगर तालुक्यांत रात्री जोरदार वादळी वाऱ्याचा फटका बसला. त्यात रावेर तालुक्यातील अटवाडा, दोधे, नेहते, अजनाड आदी गावांसह मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली, पातोंडीसह विविध गावांच्या शिवारातील केळीबागा आडव्या झाल्या. बोदवड तालुक्यातील शिरसाळा, चिंचखेडासिम, लहान मनूर, ऐनगाव, चिखली यांसह विविध गावशिवारातील केळीबागा जमीनदोस्त झाल्या.

# लोकसभा निवडणूक निकालानंतर मुंबई शहरातही मद्यविक्री करता येणार

■ **मुंबई: रघुवीर जाधव**

लोकसभा निवडणुकीसाठी येत्या ४ जून रोजी मतमोजणी होणार असून त्याचा निकाल जाहीर झाल्यानंतर मुंबई शहरातही मद्यविक्री करता येणार आहे. उच्च न्यायालयाने शुक्रवारी तशी परवानगी देताना जिल्हाधिकाऱ्यांना त्यानुसार सुधारित आदेश काढण्याचे आदेश दिले. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार निकालाच्या दिवशी पूर्ण मद्यविक्री बंदी करण्याचा आदेश काढण्यात आला आहे. त्यामुळे, त्यात कोणताही बदल करण्यास मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांनी नकार दिला. मात्र, मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत न्यायमूर्ती नितीन बोरकर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने आश्चर्य व्यक्त केले. मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांसह अन्य जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांनी निकालाच्या दिवशीच्या पूर्ण दिवस मद्यविक्री बंदीच्या आदेशात बदल केलेले असताना मुंबई शहर जिल्हाधिकारी वेगळी भूमिका कशी घेऊ शकतात ? शहरातील नागरिकांनी मद्यपानासाठी उपनगरात जायचे का ? असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला. तसेच, ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर मुंबई शहरातही मद्यविक्री करता येईल. तसे सुधारित आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी काढण्याचेही खंडपीठाने स्पष्ट केले.

निकालाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत संपूर्ण दिवस मद्यविक्रीस बंदी



करणाऱ्या मुंबई शहर आणि उपनगर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला असोसिएशन ऑफ ओनर्स ऑफ हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, परमिट रूम्स अँड बारने (आहार) वकील वीणा थडानी यांच्यामार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी झाली. त्यावेळी, निकालाच्या दिवशी संपूर्ण दिवस मद्यविक्री बंदी करणाऱ्या आपल्या आधीच्या आदेशात मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी बदल केल्याची माहिती सरकारच्या वतीने वकील ज्योती चव्हाण आणि प्राची ताटके यांनी न्यायालयाला दिली.

मुंबई शहरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मात्र असा कोणताही सुधारित आदेश काढलेला नाही. किंबहुना, केद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर निकालाच्या दिवशी पूर्ण दिवस मद्यविक्री बंदी करण्यात आली आहे. त्यामुळे, त्यात बदल केला जाणार नाही, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केल्याचेही सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर, मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत खंडपीठाने आश्चर्य व्यक्त केले. तसेच, याबाबतच्या आदेशात समता असणे आवश्यक असल्याचे नमूद करून निकाल जाहीर झाल्यानंतर मुंबई शहरातही मद्यविक्रीस परवानगी असेल, असे स्पष्ट केले.

# शाळांमध्ये मुलांना 'पाणी सुट्टी' द्यावी, बालरोग तज्ज्ञांचा सल्ला

■ **मुंबई: संजीनी खाडे**

लहान मुलांचा खेळण्याकडे कल अधिक असतो. उन्हाचीही ते तमा बाळगत नाहीत. त्यामुळे सध्याच्या वाढत्या तापमानामध्ये लहान मुलांमध्ये निर्जलीकरणाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. हे रोखण्यासाठी शाळांमध्ये 'पाणी सुट्टी' जाहीर करावी, अशा सूचना तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात येत आहेत. जेणेकरून मुले योग्य प्रमाणात पाण्याचे सेवन करतील आणि त्यांच्या शरीरातील पाणी पातळी राखण्यास मदत होईल. केरळ, झारखंड, हरियाणासह महाराष्ट्रातील शाळांमध्ये पाणी सुट्टी जाहीर करण्यावर तज्ज्ञांनी भर दिला आहे.

पाणी हे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असले तरी अनेकजण पाणी पिण्याकडे दुर्लक्ष करतात. तर लहान मुले खेळण्याच्या नादामध्ये पाणी पित नाहीत. परिणामी पाण्याच्या अभावामुळे होणाऱ्या आजारांमुळे देशामध्ये दरवर्षी जवळपास १० हजार बालकांचा मृत्यू होतो. यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास दोन हजार बालकांचा समावेश आहे. बाह्यरुग्ण विभागात दररोज साधारणपणे २० टक्के रुग्ण हे पाण्याचे कमी सेवन केल्याने होत असलेल्या आजाराने बाधित होऊन येतात. पाणी कमी सेवन करणे हे लहान मुलांच्या



जीवावर बेतण्याची शक्यता असते. त्यामुळे महाराष्ट्रातील शाळांमध्ये 'पाणी सुट्टी' देण्यात यावी. राज्य सरकारने प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम एक ते दोन शहरांमध्ये सुरू करण्याची आवश्यकता आहे, अशी सूचनाा बालरोग तज्ज्ञ डॉ. ललित वर्मा यांनी केली आहे.

वाढत्या तापमानामध्ये मुलांना निर्जलीकरणाबरोबरच अतिसाराच्या त्रासाला सामोरे जावे लागते. पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये अतिसार आणि निर्जलीकरणामुळे दरवर्षी १० हजार मुलांचा मृत्यू होतो. निर्जलीकरण व अतिसाराचा त्रास होत असलेल्या मुलांसाठी ओआरएस फायदेशीर ठरते. मात्र अतिसार झाल्यावर जवळपास ६० टक्के मुलांना ओआरएस दिले जाते. तर ४० टक्के मुले अजूनही त्यापासून वंचित आहेत. पालकांमध्ये ओआरएसबद्दल असलेले अज्ञान यास कारणीभूत आहे. अतिसारचा त्रास सुरू झाल्यावर रुग्णांना ओआरएसचे पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. जेणेकरून शरीरातील पाणी आणि मीठाचे प्रमाण कायम राहील. मात्र मूत्रपिंड आणि हृदयावर परिणाम करणारे शुगर ड्रिंक पालकांकडून मुलांना दिले जात असल्याचे बालरोग तज्ज्ञ डॉ. विभोर बोरकर यांनी सांगितले.

# राज्यात उष्माघाताचे रुग्ण २५० पार; जालना, नाशिक, बुलढाणामध्ये सर्वाधिक रुग्ण

■ **मुंबई: प्रथमेश चव्हाण**

राज्यामध्ये वाढत्या तापमानामुळे उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मागील अडीच महिन्यांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांची संख्या २५० पार गेली आहे. सर्वाधिक रुग्णांची नोंद जालना, नाशिक, बुलढाणा आणि धुळे या जिल्ह्यांमध्ये झाली आहे. राज्यामध्ये मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांमध्ये वाढत्या तापमानामुळे उष्णतेची लाट आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. त्यातच देशातील उत्तरेकडील राज्यामध्ये हवामान खात्याने अलर्ट जारी केला आहे. दिल्लीमध्ये उष्णतेचा पारा ५०



अंश सेल्सिअसच्या आसपास जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना उष्माघाताचा त्रास होण्याचे प्रमाण वाढत आहे. मार्च, एप्रिल आणि २० मेपर्यंत राज्यभरात उष्माघाताचे तब्बल २५१ रुग्ण आढळले आहेत. राज्यामध्ये एप्रिलच्या अखेरपर्यंत नाशिक व बुलढाण्यामध्ये उष्माघाताच्या रुग्णांची संख्या अधिक होती. मात्र मे महिन्यामध्ये जालना जिल्ह्यात रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. जालना व नाशिकमध्ये सर्वाधिक २८ रुग्ण सापडले आहेत. त्याखालोखाल बुलढाणा २२, धुळे २०, सोलापूर १८, परभणी १२ रुग्ण आढळले आहेत. तसेच लातूर, मुंबई आणि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# नाशिकमध्ये गाळमिश्रित पाणी पुरवठा संभव; सहा धरणे कोरडी, जिल्ह्यातील धरणसाठा १६ टक्क्यांवर

■ **नाशिक: संजीनी खाडे**

उष्णतेच्या लाटेने संपूर्ण जिल्हा तापला असताना दुसरीकडे जिल्ह्यातील धरणे तळ गाठण्याच्या मार्गावर आहेत. आतापर्यंत सहा धरणे कोरडीठाक झाली असून अन्य सहा धरणेही तळ गाठण्याच्या स्थितीत आहेत. मे अखेरीस जिल्ह्यातील धरणसाठा १६.३७ टक्क्यांवर आला आहे. नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात २८ टक्के जलसाठा आहे. पाणी पातळी खालावल्याने शहराला गाळमिश्रित पाणी पुरवठ्याची शक्यता आहे.

पावसाअभावी यंदा जिल्ह्यातील धरणांमध्ये समाधानकारक जलसाठा झाला नव्हता. समन्यायी वाटपाच्या तत्वावर काही धरणांमधून मराठवाड्यासाठी पाणी सोडावे लागले. धरणातील जलसाठा कमालीचा घटल्याचे पाटबंधारे विभागाच्या अहवालावरून स्पष्ट झाले आहे. पावसाला विलंब झाल्यास टंचाईचे संकट भयावह स्वरुप धारण करण्याची भीती व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील धरणांमध्ये सध्या १० हजार ७४७ दशलक्ष घनफूट जलसाठा आहे. गेल्या वर्षी हे प्रमाण दुप्पट म्हणजे २० हजार १२२ दशलक्ष घनफूट होते. सद्यस्थितीत ओझरखेड, पुणेगाव, तिसगाव, भोजापूर, माणिकपूंज, नागासाक्या ही धरणे कधीच कोरडीठाक झाली आहेत. भावली धरणात जेमतेम पाणी आहे. आळंदी (२.५७ टक्के), वाघाड (३.७४), वालदेवी (६.७१), केळझर (१.०५), चणकापूर धरणात (४.८६ टक्के) जलसाठा आहे. ही सहा धरणे कधीही रिक्त होतील, अशी स्थिती आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा धरणांमध्ये निम्मा जलसाठा आहे. काश्यपी धरणात १५८२ दशलक्ष घनफूट (२३ टक्के), गौतमी गोदावरी २०७ (११), पालखेड ५३ (आठ), करंजवण ७२९ (१३), दारणा १६०९ (२२), मुकणे १००४ (१३), कडवा १५७ (नऊ), नांदूरमध्यमेश्वर २५३ (९८), हरणबारी ९४ (आठ), पुनद ४९७ (३८) आणि गिरणा धरणात ३८०७ दशलक्ष घनफूट (२० टक्के) असा जलसाठा आहे. नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात १५८२ दशलक्ष घनफूट म्हणजे २८ टक्के जलसाठा आहे. गेल्या जानेवारीत शहरात पाणी कपात लागू करण्याची तयारी महापालिकेने केली होती. परंतु, लोकसभा निवडणुकीमुळे हा विषय प्रलंबित ठेवला गेला. या काळात देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली संपूर्ण शहर वा काही विशिष्ट भागातील पाणी पुरवठा वारंवार बंद ठेवला जातो. शनिवारी याच कारणास्तव संपूर्ण शहरातील पाणी पुरवठा बंद ठेवला जाणार आहे. धरणातील पातळी खालावल्यास तळाकडून पाणी उचलले जाते. त्यामुळे शहरात गाळमिश्रित पाणी पुरवठा होतो. यावेळी काहिशी तशीच स्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. या संदर्भात पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.



# जत विधानसभेसाठी पडळकरांच्या उमेदवारीस अप्रत्यक्ष विरोध

■ **सांगली: यश सावंत**

जत तालुक्यातील प्रश्नांची जाण असलेला स्थानिक उमेदवारच भाजपने द्यावा, केवळ आमदारकीसाठी लुडबूड करणाऱ्यांना पक्षाचे कार्यकर्ते सहकार्य करणार नाहीत अशी भूमिका भाजप व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी



पत्रकार बैठकीत व्यक्त केली. या बैठकीत एकप्रकारे आमदार गोपीचंद पडळकर यांना भाजपची उमेदवारी देण्यास अप्रत्यक्ष विरोध दर्शवण्यात आला. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विधानसभा निवडणूक नजरेसमोर ठेवून आमदार पडळकर यांनी एक जूनपासून जत तालुययाचा दौरा आयोजित केला आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांनी पत्रकार बैठकीत आपली भूमिका स्पष्ट केली. या बैठकीस नगरपालिकेचे माजी सभापती टिमू एडके, सरपंच परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष बसवराज पाटील, शिवसेनेचे तालुका प्रमुख निवृत्ती शिंदे, बाजचे माजी सरपंच संजय गडदे, भाजपचे शेतकरी आघाडीचे प्रमुख हणमंत गडदे, राजू पुजारी, आसंगी तुर्कचे सरपंच मिरासाहेब मुजावर, कुंभारीचे माजी उपसरपंच प्रदीप जाधव, जाडरबोबलादचे उपसरपंच प्रकाश काटे आदी उपस्थित होते. यावेळी शिंदे म्हणाले, स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्थानिकच उमेदवार असणे गरजेचे आहे. तसेच उमेदवाराने आतापर्यंत तालुक्यासाठी केलेल्या कामाचेही मोजमाप होणे आवश्यक आहे. वरून लादलेले नेतृत्व जनता स्वीकारणार नाही, तसेच उपरा उमेदवारही जतची स्वाभिमानी जनता सहन करणार नाही. जिल्हा परिषदेचे माजी सभापती आणि केंद्रिय रस्ते विकास महामंडळाचे संचालक तमणगोंडा रविपाटील यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विकास कामे तर केली आहेतच, याचबरोबर जत शहरातील भुयारी गटार योजनेसाठी निधी उपलब्ध केला आहे.

# '६ जूननंतर आमच्याकडे इनकमिंग सुरू होणार', शिरसाटांचा दावा; म्हणाले, 'शरद पवार गटाला...'

■ **मुंबई: सचिन कदम**

राज्यात सध्या सर्वांचं लोकसभा निवडणुकीच्या निकालाकडे लक्ष आहे. राज्यातील महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात खरी लढत होती. त्यामुळे महाराष्ट्रातून दिल्लीत कोणाचे सर्वाधिक खासदार जाणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्वांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागणार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात पक्षांतर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे. टीव्ही ९ मराठीने घेतलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. संजय शिरसाट म्हणाले, '६ जूननंतर आमच्याकडे इनकमिंग सुरू होईल. त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या संपर्कात अनेकजण आहेत. माझ्याही संपर्कात आहेत. आमच्याच नियमित चर्चाही होतेय. योग्यवेळेला योग्य निर्णय घेण्याची शिंदेंची स्ट्रॅटेजी आहे. त्यानुसार ते निर्णय घेतील. दरम्यान, या काळात अजित पवार यांच्याकडेही मोठ्या प्रमाणात इनकमिंग



होणार असल्याचे सूतोवाच त्यांनी दिले आहेत. ते म्हणाले, 'अजितदादांकडेसुद्धा अनेकजण येणार आहेत. कारण, आता शरद पवार गटाला कंटाळले आहेत. त्या गटात चाललेली हुकूमशाही, मीपणा आणि अहंभाव यामुळे आमदार कंटाळले. ते अजित दादांच्या संपर्कात आहेत.' २० जून २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे त्यांच्या काही आमदारांसह बाहेर पडले. त्यांच्या गटाला निवडणूक आयोगाने मूळ शिवसेनेचा दर्जा दिला. बरोबर वर्षभराने म्हणजेच १ जुलै रोजी अजित पवारांनी राष्ट्रवादीत बंड करून सत्ताधारी पक्षाला समर्थन दिलं. यामुळे राष्ट्रवादीतही दोन गट निर्माण झाले. परिणामी राज्यात मोठ्या प्रमाणात सत्तासंघर्ष निर्माण झाला. या सत्तासंघर्षामुळे लोकसभा निवडणूक चुरशीशी ठरली. ऐनवेळी अनेक इच्छूक उमेदवारांनी पक्षांतर केलं. त्यांच्याबरोबर अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारीही गेले.

# धाराशिव, तुळजापूरला अवकाळीचा तडाखा; अनेकांचे संसार उघड्यावर, जनावरेही जखमी

■ **धाराशिव: माधव अलवा**

धाराशिव व तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण भागाला गुरूवारी रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपून काढले. वादळी वाऱ्यामुळे धाराशिव तालुक्यातील इर्ला, भंडारवाडी, दाऊदपूर व तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ, अणदूर, खुदावाडी या परिसरातील अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याने संसार उघड्यावर आले आहेत. कुठेही जीवितहानी झाली नाही. मात्र बागायती पिके, घरांचे नुकसान होवून आर्थिक हानी झाली आहे. तर झाडे व पत्रे पडून जनावरे जखमी झाले आहेत.

धाराशिव तालुक्यातील इर्ला, दाऊदपूर व भंडारवाडी येथे गुरूवारी रात्री अचानक झालेल्या वादळी वारा व



पावसामुळे शेतकरी बांधवांच्या पपई, लिंबू, संत्री, केळी अशा बागांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच घरावरील पत्रे उडून अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. शुक्रवारी सकाळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नुकसानग्रस्त गावांना भेटी देवून नुकसानग्रस्त बागा, घरे आणि जखमी जनावरांची पाहणी केली व शेतकऱ्यांशी चर्चा केली. तसेच महसूल प्रशासनाला तत्काळ नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना केल्या. तुळजापूर तालुक्यातील अणदूर, खुदावाडी, कुन्सावळी, मंगरूळ या भागातही मोठ्या प्रमाणात वादळी वारे होते. पाऊस कमी व वादळी वारे तीव्र स्वरूपाचे असल्याने अनेक ठिकाणी रस्त्यालगतची झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक खोळंबली होती. आमदार पाटील यांनी प्रशासनाला सूचना देवून रस्त्यावर पडलेली झाडे हटवून वाहतूक खुली करून दिली. तसेच नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश धाराशिव व तुळजापूरच्या तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

# महाराष्ट्रात येणारा ५० हजार कोटींचा उद्योग राज्याबाहेर गेला; विरोधकांकडून टीका

■ **मुंबई: प्रथमेश चव्हाण**

गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड म्हणजेच 'गेल' कंपनीकडून मध्य प्रदेशमध्ये ५० हजार कोटींचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील संभाजीनगर किंवा दाभोळ येथे होणारा हा प्रकल्प आता मध्यप्रदेशाच्या सिहोर येथे उभारला जाणार आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी याघटनेवरून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला येणारा उद्योग असा सहज बाहेर कसा गेला? याचे उत्तर उद्योगमंत्र्यांनी द्यावे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर किंवा दाभोळ येथे @gailindia 50 हजार कोटींची गुंतवणूक करून इथेन क्रॅकिंग युनिट उभारणार होते. आता हा प्रकल्प महाराष्ट्रात न येता मध्यप्रदेशाच्या सिहोर येथे उभारला जाणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राचा विचार करत असताना मध्य




प्रदेशात कसा गेला? इकॉनॉमिक टाइम्सने दिलेल्या बातमीनुसार, ही गुंतवणूक सरकारी गॅस प्रकल्पातील आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक आहे. गेलकडून मध्य प्रदेशच्या सिहोरमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात प्रति वर्षी १.५ दशलक्ष टन इथेन क्रॅकिंग करण्यात येणार आहे.

# अष्टविनायक


**अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे आहेत. पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या ह्या देवळांना स्वतंत्र इतिहास आहे. या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाईच्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते. श्री गणपतीची महाराष्ट्रातील प्रत्येक गावात एक-दोन मंदिरे हमखास पाहण्यास मिळतात. त्या मंदिरांतून गणेशाची हजारो रूपे भाविक अनुभवतात. असे असले तरी, महाराष्ट्रातील या विशिष्ट 'आठ' ठिकाणच्या गणेश मंदिरांना, मूर्तींना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांस मिळून 'अष्टविनायक' म्हटले जाते. गणपतीच्या अनेक नावांपैकी एक नाव म्हणजे विनायक; म्हणूनच या मंदिरांचा संच म्हणजे अष्टविनायक. अष्टविनायकांची मंदिरे (स्थळे) महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत. गणपती ही विद्येची देवता असून तो, सुखकर्ता, दुःखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेश भक्तांची भावना आहे.**

श्री गणेशाच्या अनेक प्रतिमा (मूर्ती) तयार केल्या गेल्या परंतु दगडावर कोरीवकाम करून निर्माण केलेल्या प्राचीन मूर्तींचा शोध ज्या ठिकाणी लागला, तसेच जेथे 'स्वयंभू' प्राचीनतम मूर्ती सापडल्या अशा स्थळांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. याच मंदिरांना अष्टविनायकांची मंदिरे समजले जाते. महाराष्ट्रातील असंख्य भाविक अष्टविनायकाची यात्रा करतात. अष्टविनायकाची सर्व मंदिरे ही अंतराच्या दृष्टीने परस्परांच्या जवळ आहेत. साधारणपणे दीड ते दोन दिवसांत ही अष्टविनायक यात्रा पूर्ण होऊ शकते. पुणे जिल्हयात पाच (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री), रायगड जिल्हयात दोन (महड, पाली) व अहमदनगर जिल्हयात एक (सिद्धटेक) या ठिकाणी 'अष्टविनायक स्थाने' आहेत. या गणपतीपैकी महड, सिद्धटेक व रांजणगावचा गणपती हे उजव्या सोंडेचे आहेत. बाकीचे डाव्या सोंडेचे. या सर्व गणपतींची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

**मोरगांव:** अष्टविनायकां पैकी पहिला गणपती हा मोरगावचा मोरेश्वर. गाणपत्य संप्रदायाचे हे महत्त्वाचे स्थान आहे. या गणपतीस श्री मयुरेश्वर असेही म्हणतात. थोर गणेशभक्त मोरया गोसावी यांनी येथील पूजेचा वसा घेतला होता. श्री मोरेश्वर गणेशाचे, हे स्वयंभू व आद्यस्थान आहे. प्रत्येक घरात म्हटली जाणारी ' सुखकर्ता दु:खहर्ता' ही आरती श्री समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली, असे म्हटले जाते.

जवळच कऱ्हा ही नदी आहे. मंदिरावर अनेक प्रकारचे नक्षीकाम केलेले आहे. श्री मोरेश्वराच्या डोळ्यांत व बेंबीत हिरे बसवलेले आहेत. या मंदिराच्या भोवती बुरूजसदृश दगडी बांधकाम प्राचीन काळापासून आहे. पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यात मोरगांव हे ठिकाण आहे. मोरगाव हेरावर आहे. तर बारामतीपासून ३५ कि. मी. अंतरावर आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा हा मोरगावपासून अगदी १७ कि. मी. अंतरावर आहे. या तीनही ठिकाणांपासून मोरगांवला जाण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीची सोय आहे. मोरगाव गणेश मंदिर हे आदिलशाही काळात पराक्रमी सुभेदार गोळे यांनी बांधले आहे,त्यांचे वंशज पिरंगुट या गावी आजही राहतात

**थेऊर:** अष्टविनायकांपैकी थेऊरचा श्री चिंतामणी हा दुसरा गणपती आहे. थेऊरच्या कदंब वृक्षाखाली हे श्री गणेशाचे ठिकाण आहे. भक्तांच्या चिंतेचे हरण करणारा म्हणून याला चिंतामणी म्हणतात. पुण्यातील पेशव्यांच्या घरातील अनेक जण थेऊरला सतत येत असत. पेशवे घराणे खूप मोठे गणेशभक्त होते. थेऊरचा विस्तार हा माधवराव पेशवे यांनी केला. माधवराव पेशव्यांचे निधन थेऊरलाच झाले. यांच्याबरोबर सती गेलेल्या रमाबाई यांची समाधीदेखील या ठिकाणी आहे. मंदिराच्या आवारात निरगुडकर फाउंडेशन निर्मित थोरल्या माधवरावांची स्फूर्तिदायक कारकीर्द दाखवणारे कलात्मक दालन आहे.




थेऊर पुणे-सोलापूर महामार्गाला जोडलेल्या रस्त्यावर, तालुक्यात असून पुण्यापासून हे ३० कि. मी. अंतरावर आहे. पुण्यापासून बसेसची सोय आहे. (थेऊरपासून जवळच ऊरळीकांचनला महात्मा गांधींनी स्थापन केलेले निसर्गोपचार केंद्र आहे.)

**सिद्धटेक:** सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक हा अष्टविनायकांपैकी तिसरा गणपती. उजवी सोंड असणारा




एकमेव अष्टविनायक. हे भीमा नदीवर वसलेले सिद्धिविनायकाचे स्वयंभू स्थान आहे. याचा गाभारा लांबी-रुंदीने भरपूर मोठा आहे. तसेच मंडपही मोठा-प्रशस्त आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार करून मंदिर बांधले आहे. मंदिरात पितळी मखर असून त्याभोवती चंद्र-सूर्य-गरुड यांच्या प्रतिमा आहेत. अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यात हे ठिकाण असून दौंडपासून १९ कि. मी. अंतरावर आहे. तर राशिनपासून २३ कि. मी. अंतरावर आहे. दौंडहून गेल्यास वाटेत भीमा नदी लागते, ती ओलांडायला होड्या असतं मात्र सध्या पूल झाला आहे.

**रांजणगाव:**

अष्टविनायकांपैकी हा चौथा गणपती. या गणपतीला महागणपती असे म्हणतात. हे महागणपतीचे स्वयंभू स्थान आहे. पुणे-अहमदनगर मार्गावर शिरूर तालुक्यात हे ठिकाण आहे.

या स्थानासंदर्भात एक दंतकथा आहे ती अशी की :- त्रिपुरासुर या दैत्यास शिवशंकरांनी काही शक्ती प्रदान केल्या होत्या. या शक्तीचा दुरूपयोग करून त्रिपुरासुर स्वर्गलोक व पृथ्वीलोक येथील लोकांना त्रास देऊ लागला. शेवटी एक वेळ अशी आली की, शिवशंकराला श्री गणेशाचे नमन करून त्रिपुरासुराचा वध करावा लागला. म्हणून या गणेशाला 'त्रिपुरारिवदे( ?) महागणपती' असेही म्हटले जाते.

अष्टविनायकांपैकी सर्वाधिक शक्तिमान असे महागणपतीचे रूप आहे. श्री महागणपती उजव्या सोंडेचा असून गणेशाला कमळाचे आसन आहे. माधवराव पेशव्यांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे इतिहासात आढळते. इंदूरचे सरदार किबे यांनीदेखील या मंदिराचे नूतनीकरण केल्याचा उल्लेख आढळतो. त्यांनी या देवळातला लाकडी सभामंडप बांधून दिला आहे.

हे श्री महागणपतीचे स्थान इ.स. १० व्या शतकातील आहे. श्री गणेशाला दहा हात आहेत आणि प्रसन्न व मनमोहक अशी श्रींची मूर्ती आहे.

**ओझर:** अष्टविनायकांपैकी ओझरच्या विघ्नेश्वर हा पाचवा गणपती आहे. येथील श्रींची मूर्ती लांब रूंद असून अष्टविनायकापैकी सर्वात श्रीमंत गणपती म्हणून श्री विघ्नेश्वराला ओळखले जाते. श्रींच्या डोळ्यात माणिक असून, कपाळावर हिरा आहे. अशी प्रसन्न व मंगल मूर्ती असलेला श्रीगणेश विघ्नांचे हरण करतो, म्हणून या गणपतीला विघ्नेश्वर म्हणतात. ही गणेशाची स्वयंभू मूर्ती आहे. मंदिराच्या चारही बाजूंना तटबंदी-बांधकाम असून, मध्यभागी गणेशाचे मंदिर आहे. कुकडी नदीच्या तीरावर असलेले हे मंदिर एक जागृत स्थान आहे. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो.

मंदिराच्या परिसरात भाविकांना राहण्यासाठी धर्मशाळेची उत्तम व्यवस्था आहे. जुन्नर तालुक्यातील हे स्थान लेण्याद्रीपासून १४ कि. मी. वर तर पुण्यापासून ८५ कि. मी. अंतरावर आहे. येथून जवळच आर्वी उपग्रह केंद्र व खोडद येथील आशिया खंडातील सर्वात मोठी इलेक्ट्रॉनिक दुर्बिण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला हादेखील जवळच आहे.

**लेण्याद्री:**

अष्टविनायकापैकी सहावा गणपती लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज. किल्ले शिवनेरीच्या सान्निध्यात, जुन्नर तालुक्यातील प्राचीन जुन्नर लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरात डोंगरावर श्री गिरिजात्मज गणेशाचे हे स्वयंभू स्थान आहे. श्री गणेशाची प्रसन्न मूर्ती असून ती दगडामध्ये कोरलेली आहे. मंदिर परिसरातील खडकामध्ये कोरीवकाम, खोदकाम केलेले आहे. पेशवे काळात या मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. मंदिरात दगडी खांब आहेत व त्यावर वाघ, सिंह, हत्ती असे सुंदर नक्षीकाम केलेले आहे. मंदिरात जाण्यासाठी डोंगरावर सुमारे ४०० पायऱ्या आहेत.

लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज हा जुन्नरपासून ७ कि.मी. अंतरावर आहे, तर पुण्यापासून सुमारे ९७ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे.

**महड:** महडचा वरदविनायक हा अष्टविनायकांपैकी सातवा गणपती आहे. हे स्वयंभू स्थान असून त्याला मठ असेही म्हणतात. श्री वरदविनायकाचे मंदिर साधे, कौलारू असून मंदिराला घुमट आहे व त्याला सोनेरी कळस आहे. कळसावर नागाची नक्षी आहे.

या मंदिरासंदर्भात एक कथा प्रसिद्ध आहे. एका भक्ताला स्वप्नात देवळाच्या मागील तळ्यात पाण्यात पडलेली मूर्ती दिसली. त्याप्रमाणे त्या व्यक्तीने शोध घेतला व मूर्ती मिळाली. तीच या मंदिरातील प्रतिष्ठापना केलेली मूर्ती होय. मंदिरात दगडी महिरप असून गणेशाची मूर्ती सिंहासनारूढ आहे व उजव्या सोंडेची आहे. इ.स. १७२५ मध्ये पेशवे काळात हे मंदिर बांधले गेले.

रायगड जिल्हयातील महड हे पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर खोपोली - खालापूरच्या दरम्यान आहे.

**पाली:** पालीचा गणपती हा अष्टविनायकांपैकी आठवा गणपती आहे. या गणपतीला श्री बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळेश्वर गणपतीचे हे स्वयंभू स्थान आहे.ड१२.मंदिर पूर्वाभिमुख आहे. गणेशाचे कपाळ विशाल असून डोळ्यात हिरे आहेत. मंदिर चिरेबंदी आहे. मंदिरात प्रचंड घंटा असून ती चिमाजी अप्पांनी अर्पण केली आहे. हे स्थान रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यात असून, सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबा नदीच्या निसर्गरम्य सान्निध्यात बल्लाळेश्वराचे मंदिर वसले आहे. पालीपासून जवळच उन्हेरचे गरम पाण्याचे झरे व सरसगड हा प्राचीन किल्ला आहे. पाली खोपोलीपासून ३८ कि. मी. अंतरावर आहे तर पुण्यापासून १११ कि. मी. अंतरावर आहे. खोपोली - पेण रस्त्यावर पालीस जाण्यास रस्ता फुटतो, तर पनवेल - गोवा या राष्ट्रीय महामार्गावर वाकणपासून पालीस रस्ता जातो. भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला या आठही ठिकाणी यात्रा भरते. सर्व जाती-धर्माचे लोक या ठिकाणी येऊन श्रद्धापूर्वक दर्शन घेतात. भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या काळात श्री गणेशाचा उत्सव सर्वत्र साजरा केला जातो.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# खिशातील एक चिठ्ठी आणि गुगलवरून शोध, महामार्गावरील तरुणाच्या हत्येची उकल

**■ वसई: विशेष प्रतिनिधी**

**मुंबई अहमदाबाद महामार्गावर सापडलेल्या एका अनोळखी तरूणाच्या हत्येची उकल करण्यात पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे. या मयताच्या खिशात सापडलेल्या एका चिठ्ठीवरून पोलिसांनी गुगलच्या मदतीने शोध घेत आरोपीचा माग काढला**

शुक्रवार १० मे रोजी मुंबई अहमदाबाद महामार्गावरील सोपारा फाट्यावर एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला होता. हा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत होता त्यामुळे त्याची ओळख पटत नव्हती. पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. पोलिसांना मयत तरुणाच्या खिशात पोलिसांना एका चिठ्ठी सापडली. त्यावर 'एस्सेल' असे नाव होते. तेवढ्या एका दुव्यावरून पोलिसांना मयताची ओळख पटवून हत्येचा तपास करायचा होता.

'एस्सेल' नावावरून काहीच बोध होत नव्हता. मग पेल्हार पोलिसांनी त्या चिठ्ठीवरील 'एस्सेल' नावाचा गुगलवरून शोध घेतला. तेव्हा विविध संकेतस्थळांची नावे समोर आली. त्यात एक नाव मानखुर्द येथील एका स्टुडियोचे होते. या स्टुडियोतून सिनेमासाठी ज्युनिअर आर्टीस्ट पुरवले जात होते. पोलिसांनी त्या स्टुडियोला भेट दिली. तेथे येणाऱ्या सुमारे दिडशे लोकांना चिठ्ठी दाखवून चौकशी केली. तेव्हा एका तरुणीने





चिठ्ठीचे हस्ताक्षर ओळखले. ते हस्ताक्षर संतोषकुमार यादव या तरुणाचे होते. ७ मे पासून त्याचा फोन बंद येत असल्याचे तिने पोलिसांना सांगितले. ७ मे रोजी संतोषकुमारने तिला व्हिडिओ कॉल केला होता. त्यावेळी त्याच्यासोबत सनी सिंग आणि राहुल पाल अशी दोन तरुण होते. मयताची ओळख पटल्याने पोलिसांचे पुढील काम सोपे झाले.

याबाबत माहिती देताना पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी सांगितले की, मयत संतोषकुमार यादव हा सिनेसृष्टीत मॉडेल पुरविण्याचे काम करत होता. त्याला या कामाचे एक मोठे कंत्राट मिळाले होते. त्यामुळे त्याचे प्रतिस्पर्धी असलेल्या सनी सिंग आणि राहुल पाल यांनी संतापून त्याचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. ७ मे रोजी दोघांनी संतोषकुमारला या कामाची पार्टी देण्यासाठी बोलावले. त्याला भरपूर मद्य पाजल्यानंतर डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. यानंतर त्याचा मृतदेह महामार्गालगत सोपारा फाट्याजवळ टाकून दिला. पोलिसांनी सनी सिंग याला अटक केली. राहुल पालचा शोध सुरू आहे. पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील,पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, योगेश देशमुख, आदींच्या पथकाने या क्लिष्ट गुन्ह्याची उकल करून आरोपीला बेड्या ठोकल्या.

## बारावीत ७८% मिळवूनही विद्यार्थिनीची आत्महत्या; ९० टक्के न मिळाल्याने होती निराश

**■ मुंबई: विशेष प्रतिनिधी**

बारावीच्या निकालात ९० टक्के न मिळाल्याने एका विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भाईदर मध्ये घडली आहे. तिला ७८३ मिळाल्याने ती निराश होती. अनुष्का मेहरबानसिंह कबचुरी( १७) असे मयत विद्यार्थिनीचे नाव आहे. ती यंदा बारावीच्या वाणिज्य ( कॉमर्स ) शाखेतून परीक्षेत बसली होती. अनुष्का हुशार विद्यार्थिनी होते तिला बारावी मध्ये ९०३ पेक्षा जास्त गुण मिळतील अशी अपेक्षा होती मंगळवारी बारावीचा निकाल जाहीर झाला. त्यात तिला ७८ टक्के गुण मिळाले.मात्र ९० टक्क्याहून अधिक गुणांची अपेक्षा असताना कमी गुण मिळाल्याने ती




नैराश्यात गेली होती.परिणामी दुपारी घरात कोणीही नसताना नायलॉनच्या दोरीने पंख्याला गळफास घेत तिने आत्महत्या केली, अशी माहिती नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांनी दिली.

## जिवंत वडीलांचा मृत्यूदाखला बनविल्याने तीघांविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल

**■ पनवेल: विशेष प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे पनवेल येथील जमिनीला सोन्याचा भाव आला आहे. वडीलोपार्जित




जमीनीवर हक्क सांगून त्यांचे भागधारकांमध्ये अनेक वादविवाद उजेडात येत आहे. पनवेल पोलीस ठाण्यात नूकत्याच नोंदविलेल्या एका फसवणूकीच्या गुन्ह्यात १३ वर्षांपूर्वी जिवंत असलेल्या वडिलांना मृत घोषित करुन त्या वडीलांचे खोटे वारस दाखला न्यायालयाची दिशाभूल करुन बनवून जमिन बळकाविण्याचा प्रकार उजेडात आला आहे. ठाणे येथील नौपाडा येथे राहणाऱ्या रोहीणी मालपेकर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीमध्ये त्यांचे वडील नामदेव म्हात्रे हे ४ जुलै २०११ रोजी जिवंत असतानाही त्यांचे नातेवाईक राजेंद्र म्हात्रे, शरद म्हात्रे, सुभद्रा तळकर यांनी नामदेव यांना मृत असल्याचे कागदोपत्री न्यायालयास दर्शवून बनावट वारस दाखला मिळविला. तो बनावट वारसदाखला पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात वापरुन त्यासंदर्भात खोटे दस्त बनविल्याची तक्रार पोलीसांत रोहीणी यांनी दिली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# दीड लाख रुपयांसाठी तीन महिन्यांच्या बाळाच्या विक्रीचा आईकडून प्रयत्न - बाळाच्या आईसह नऊ दलाल अटकेत

**■ ठाणे: विशेष प्रतिनिधी**

**दीड लाख रुपयांसाठी आईने तिच्या तीन महिन्यांच्या मुलीची दलालांमार्फत विक्री करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी ठाणे पोलिसांनी आईसह नऊ जणांना अटक केली आहे. पोलिसांनी बाळाची सुखरूप सुटका केली असून बाळाला नवी मुंबई येथील विश्व बालक केंद्र येथे ठेवण्यात आले आहे. अटकेत असलेल्या आरोपींमध्ये तृतीयपंथी व्यक्तीचाही सामावेश आहे अशी माहिती उपायुक्त पराग मणेरे यांनी दिली.**

शालु शेख (२५) असे बाळाच्या आईचे नाव आहे. तर साहिल हुसेन, साहिदा शेख, खतजा सद्दाम हुसेन खान, प्रताप केशवानी, मोना खेमाने, सुनीता बैसाने, सर्जेराव बैसाने, राजु वाघमारे (तृतीयपंथी) अशी आरोपींची नावे आहेत. मुंब्रा येथील अमृतनगर भागात बाळांची विक्री करणारी टोळी असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, साहाय्यक पोलीस आयुक्त नीलेश सोनवणे



यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांचे विशेष पथक स्थापन केले. पोलिसांनी एक बनावट ग्राहक तयार करून मुंब्रा येथील सहिदा आणि साहिल या दोघांना संपर्क साधला. तसेच त्यांच्याकडे बाळाबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी एक तीन महिन्यांची मुलगी असल्याचे सांगितले. बाळाच्या मोबदल्यात त्यांनी पाच लाख रुपयांची मागणी केली. २३ मे या दिवशी साहिदा आणि साहिल यांनी मुंब्रा येथील रेतीबंदर परिसरात बनावट ग्राहकाला पैसे घेऊन बोलावले. त्यावेळी पोलिसांनी सापळा रचून साहिल, साहिदा, खतजा, प्रताप, मोना, सुनीता आणि सर्जेराव यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तीन महिन्यांचे बाळ होते. त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांचे आणखी काही साथिदार नाशिक येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे, बाळाची आई शालु आणि तृतीयपंथी व्यक्ती राजु याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

बाळाच्या आईची आर्थिक परिस्थीत बिकट होती. तसेच तिचा पती सांभाळ करत नव्हता. त्यामुळे तिने बाळाच्या विक्रीचा निर्णय घेतला होता. याबाबतची माहिती राजु याला मिळाली होती.

## नाशिकमधील ज्वेलर्सकडे सापडलं २६ कोटींचं घबाड; नोटांचा खच, ९० कोटींची बेहिशोबी मालमत्ता

**■ नाशिक: विशेष प्रतिनिधी**

नाशिकमधील सुराणा ज्वेलर्सवर प्राप्तिकर विभागाने धाड टाकून ३० तास शोध मोहिम राबविली. यानंतर ज्वेलर्समधून २६ कोटींची



रोकड जप्त करण्यात आली आहे. तर ९० कोटींच्या संपत्तीचे कागदपत्रेही ताब्यात घेण्यात आली आहेत. नागपूर आणि जळगावमधील अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन ही कारवाई केली आहे. जप्त केलेली रोकड मोजण्यासाठी अधिकाऱ्यांना १४ तासांचा वेळ लागला. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात प्राप्तिकर विभागाकडून कारवाई होत आहेत. काही दिवसांपूर्वी नांदेडमधील संजय भंडारी नावाच्या व्यावसायिकावर अशाचप्रकारे कारवाई करत १७० कोटींची बेहिशोबी मालमत्तेवर टाच आणली होती. तर धाडीत १४ कोटींची रोकड आणि ८ किलो दागिने जप्त केले होते. त्यानंतर नाशिकमध्ये मोठी कारवाई झाल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

## मोठ्या आवाजात भांडणाऱ्याकडे पाहिल्याने कामोठ्यात डॉक्टराला मारहाण

**■ पनवेल: विशेष प्रतिनिधी**

एक तरुण रात्रीच्या साडेबारा वाजता दोन मुलीसोबत भांडत होता. तो तरुण मोठ्या आवाजात का भांडतोय, हे तिथे रिक्षाची वाट बुधवारी मध्यरात्री घडला.

सामान्य व्यक्ती सहसा रस्त्याकडेला उभे असले तरी कोणाच्या मदतीसाठी पुढे सरसावत नाहीत. दूसऱ्या व्यक्तीच्या अडचणी सोडविताना



पाहत उभ्या असलेल्या एका ६९ वर्षीय डॉक्टरांनी पाहीले. एवढेच निमित्त झाल्याने या २० वर्षीय तरुणाने लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत डॉक्टरांच्या डाव्या हाताच्या मनगटाला फॅक्चर झाले. हा सर्व प्रकार कामोठे वसाहतीमधील सेक्टर ७ येथे स्वताची अडचण वाढू नये असा त्यामागील भाव असतो. मात्र करंजाडे येथे राहणारे ६९ वर्षीय नंदलाल रायदास हे बुधवारी रात्री साडेबारा वाजता कामोठे वसाहतीमधील सेक्टर ७ येथील साईप्रसाद आर्केड या इमारतीजवळ रिक्षाची वाट पाहत उभे होते. या दरम्यान कामोठे वसाहतीमधील सेक्टर २२ येथील तुलसी हाईट्स या इमारतीमध्ये राहणारा २० वर्षाचा शंभुराज भोसले हा दोन मुलीसोबत तिथे भांडण करत होता. डॉ. नंदलाल यांनी शुंभराज याच्याकडे मोठ्या आवाजाने का भांडण करीत आहेस एवढीच विचारणा केली याचा राग शंभुराज याला आल्याने त्याने डॉ. नंदलाल यांना लाथाबुक्याने मारहाण केली. जखमी अवस्थेत ६९ वर्षीय डॉ. नंदलाल हे रुग्णालयात जाऊन त्यांनी उपचार घेतले. पहाटे पाच वाजता त्यांनी शंभुराज याच्याविरोधात गुन्हा नोंद केला. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात मारहाणीबाबत गुन्हा नोंद केला असून हा गुन्हा सात वर्षाच्या पेक्षा कमी शिक्षेचा असल्याने संशयीत आरोपी शंभुराज भोसले याला कलम ४१ (अ)(१) फौजदारी प्रक्रीया संहिते अन्वये नोटीस देऊन सोडण्यात आले आहे.

## पत्नीची छेड काढत असल्याने मित्राची हत्या, विरार पोलिसांनी केली आरोपीला अटक

**■ वसई: विशेष प्रतिनिधी**

पत्नीची छेड काढल्याने मित्राची हत्या केल्याचे प्रकरण विरारमध्ये उघडकीस आले आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी आरोपी मित्राला अटक केली आहे. एक महिन्यापूर्वी आरोपीने आपल्या मित्राची हत्या केली होती.

एप्रिल महिन्यात विरार पूर्वेच्या साईनाथ नगर येथील डोंगरावर एका इसमाचा मृतदेह आढळला होता. त्याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्याच्या हातावर 'शारदा' असे नाव गोंदविलेले होते. काही दिवसांनी रमेश नायर (४८) नावाचा इसम बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या नातेवाईकांनी दिली. त्याची पडताळणी केली असता डोंगरावर आढळलेला मृतदेह हा रमेश नायरचा असल्याचे स्पष्ट झाले होते. शारदा हे मयत रमेश नायरच्या पत्नीचे नाव होते. शवविच्छेदनात त्याच्या छातीवर मार लागल्याने मृत्यू झाल्याचे उघड झाले. त्यामुळे विरार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता. मात्र त्याची हत्या का आणि कुणी केली याचा उलगडा होत नव्हता. विरार पोलीस या प्रकरणाचा



तपास करत होते. पोलिसांनी केलेल्या तपासात मयत गोविंद खानिया या त्याच्या मित्रावर संशय आला. मयत रमेश नायर (४८) आणि गोविंद कुमर खानिया हे दोघे मित्र होते. मात्र रमेश गोविंदच्या बायकोवर एकतर्फी प्रेम करत होता. वारंवार तो तिची छेड काढत होता. त्यामुळे गोविंदने मयर नायर याला डोंगरावर नेले आणि त्याला मारहाण करून त्याची हत्या केली.

# राज्यात २० बांगलादेशी नागरिकांना अटक, बोरिवली पोलिसांची कारवाई

**■ मुंबई: विशेष प्रतिनिधी**

अवैधरित्या घुसखोरी करून मुंबईमध्ये राहत असलेल्या तीन बांगलादेशी नागरिकांना बोरिवली पोलिसांनी ऑक्टोबर २०२३ रोजी अटक केली होती. त्यांची चौकशी करून नालासोपारा, विरार, पुणे येथून आणखी १७ बांग्लादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. यामध्ये दोन भारतीय दलालांचा समावेश आहे. अटक केलेल्या बांगलादेशी नागरिकांना न्यायालयाने आठ महिने कारावास व चार हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सुमन मोमीन सरदार उर्फ विश्वजित बाटुल मंडल (३१), ओमर फारुख मोल्ला उर्फ नासिर शाहजहान उद्दिन (२७) सलमान अयुब खान उर्फ अब्दुल सलाम आयुब मोडल (३४), अतिकुल अकिलुद्दीन मुल्ला (२३), सैदुल सफरअली गामन (२७) मुस्ताकअली कुतुबुद्दीन तरबदार (२२), फिरोज उलहक मोल्ला (२१), रहिम मोईद्दीन मंडल उर्फ रहिमुद्दीन मुल्ला (३२), रॉनी शफीकुल शेख उर्फ रशीद उलइस्माम मोनीर होलादार (२२) इनामुल कमल सरदार (२२), मसुद राणा इद्रीस गाझी (२२), रिपोन



रोमेन ढाली (३४), मोनीरुल मोहमद मुल्ला (२५), आरीफ शौकत विश्वास (२५) मसुम बिल्ला अश्रफ मंडल (२५), दिलावर इद्रीस गाझी (२३), रब्बी कजल मंडल (२५), मुबीन जावेद मंडल उर्फ मुबीन सोईदुल इस्लाम (२६), सुजौन शोरीफउल शेख (२६), मिठु शोफीकुल शेख (२८) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

बोरिवली पोलिसांनी १९ ऑक्टोबर २०२३ रोजी तीन घुसखोर बांगलादेशी नागरिकांन अटक केली होती. त्यांच्या चौकशीत मुंबईत अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या काही बांगलादेशी नागरिकांची नावे उघड झाली होती. बोरिवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निनाद सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने या आरोपींचा शोध सुरू केला. त्यानंतर नालासोपारा, विरार आणि पुणे येथून आणखी १७ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. तसेच पुणे येथे बनावट कागदपत्रे बनवून देणाऱ्या दोन दलालांनाही अटक करण्यात आली. या बांगलादेशी नागरिकांकडे भारतीय पारपत्र, व्हीसा, जन्म प्रामाणपत्र, आधारकार्ड, पॅनकर्ड, मतदानकार्ड इत्यादी बनावट भारतीय कागदपत्रे सापडली.

## प्रियकराचा बदला घेण्यासाठी लावला 'हनी ट्रॅप', अपहरण करून मागितली १ लाखांची खंडणी

**■ वसई: विशेष प्रतिनिधी**

मधुजाल (हनी ट्रॅप) लावून एका गुजराती व्यापाऱ्याचे अपहरण आणि बलात्काराची धमकी देत खंडणी उकळल्याचा प्रकार मिरारोड मध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी काशिगाव पोलिसांनी अवघ्या काही तासात ४ तरुणींसह पाच जणांच्या टोळीला अटक केली आहे. यातील एका कॉल गर्ल असलेल्या महिलेने व्यापाऱ्याचा बदला घेण्यासाठी ही योजना बनवल्याचे तपासात उघड झाले आहे. मिरारोडमध्ये राहणाऱ्या ६० वर्षीय व्यापाऱ्याला १६ मे रोजी पिंकी नावाच्या तरुणीने कॉल करून कामाची गरज असल्याचे सांगितले. यानंतर पांडव पिंकीला शांती गार्डन येथे भेटले. यावेळी पिंकीने व्यापाऱ्याशी गोड बोलून मैत्री केली. यानंतर पिंकीने ठरलेल्या योजनेनुसार २१ मे रोजी तिने व्यापाऱ्याला मिरा रोड येथील हिल टॉ



प हॉटेलमध्ये बोलावले. तिने टाकेलल्या जाळ्यात व्यापारी अलगद सापडला. पिंकीने रुममध्ये जाताच व्यापाऱ्याचे मोबाईलमधून चित्रिकरण करायला सुरवात केली. व्यापाऱ्याला संशय आल्याने तो रूममधून निघाला.

मात्र हॉटेल बाहेर पडताच पिंकी आणि अन्य एका तरुनीने व्यापाऱ्याला यांना एका रिक्षात बसवून गोराईला नेले. तेथे त्याच्या साथादीराने या व्यापाऱ्याला बेदम मारहाण केली. १ लाख रुपये दे अन्यथा बलात्काराचा गुन्हा दाखल करून अशी धमकी दिली. पैसे काढण्यासाठी आरोपींनी व्यापाऱ्याला एका एटीएममध्ये नेले. मात्र पैसे निघाले नाही. त्यामुळे त्याच्या खिशातील ५ हजार काढून घेण्यात आले. या प्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य पाहून तपास सुरू केला. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अभिजित लांडे आणि त्यांच्या पथकाने सीसीटीव्ही आणि तांत्रिक माहितीच्या आधारे तपास केला आणि अवघ्या ५ तासात या टोळीला अटक केली. त्यामध्ये सोनाली महाले (२८) निशा गायकवाड (४५), दिपा प्रजापती (३८) दर्शना गायकवाड (२२) आणि मलिक फक्की (२४) या पाच जणांचा समावेश आहे.

## दाऊदशी संबंधित गुन्ह्यांत अडकल्याचे भासवून व्यावसायिकाची सायबर फसवणूक

**■ मुंबई: विशेष प्रतिनिधी**

**कुख्यात गुंड दाऊदशी संबंधित गुन्ह्यांत अडकल्याचे भासवून व्यावसायिकाची सायबर फसवणूक करण्यात आली असून याप्रकरणी कुलाबा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी व्यावसायिकाच्या बँक खात्यातून झालेल्या व्यवहारांची माहिती घेण्यात आली असून त्या आधारे तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.**

तक्रारदाराचा ब्रँड मार्केटिंगचा व्यवसाय असून ते कुलाबा परिसरात राहतात. त्यांना १७ मे रोजी स्काईवरून एका दूरध्वनी आला होता. त्यात समोरच्या व्यक्तीने आपण कुरियर कंपनीतून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या नावाने तैवानवरून एक कुरियर आले असून त्यात लॅपटॉप, बनावट पारपत्र, क्रेडीटकार्ड व अमली पदार्थ असल्यामुळे ते



विमानतळावर थांबवले आहे. तुमचा याप्रकरणाशी संबंध नसेल, तर तुम्ही याप्रकरणी सायबर पोलिसांकडे तक्रार करा, तुम्हाला मी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलशी जोडत असल्याचे दूरध्वनीवर बोलणाऱ्या व्यक्तीने सांगितले. त्यानंतर एक सायबर सेलचा अधिकारी दूरध्वनीवर आला. त्याला व्यावसायिकाने आपण असे कोणतेही कुरियर मागवले नसल्याचे सांगितले. त्यावर या तोतया सायबर अधिकाऱ्याने व्हिडिओ कॉलवर आमच्याशी संपर्क साधा असे सांगितले.

व्हिडिओ कॉलदरम्यान त्या तोतया सायबर अधिकाऱ्याने तक्रारदाराकडून सर्व माहिती मिळविली. तसेच त्यांचा आधारकार्ड क्रमांकही घेतला. आधारकार्डची पडताळणी केल्याचे भासवल्यानंतर संबंधित आधारकार्ड क्रमांक विविध राज्यांमध्ये १२ ते १५ गुन्ह्यांशी जोडला गेला आहे. तसेच मोहम्मद इस्लाम नवाब मलिक यांच्याशी संबंधित असून याप्रकरणाचे धागेदोरे थेट दाऊदपर्यंत पोहोचले असल्याचे सांगितले. त्यामुळे तक्रारदार घाबरले. त्यानंतर आरोपींनी सीबीआयच्या नावाने तक्रारदाराला एक नोटीस पाठवली. उपायुक्त दर्जाचा अधिकाऱ्याने तक्रारदाराशी संपर्क साधला. त्याने तुमच्या बँक खात्यात काळा पैसा असून ती रक्कम आरबीआयशी संबंधित बँक खात्यात पाठवण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदाराने आरटीजीएसद्वारे दोन लाख ६२ हजार रुपये एका बँक खात्यात जमा केले.

# डोंबिवलीत कंपनी स्फोटाने नुकसान झालेल्या ९४१ मालमत्तांचे पंचनामे

■ डोंबिवली: सतिश सोनावणे

**येथील एमआयडीसीतील अमुदान कंपनी स्फोटामुळे नुकसान झालेल्या एक ते दोन किलोमीटर परिसरातील कंपन्या, हॉटेल्स, इमारती, घरे अशा एकूण ९४१ मालमत्तांचे पंचनामे करण्यात आले आहेत. या पंचनाम्यांचा सविस्तर अहवाल वरिष्ठांना पाठविण्यात येईल, अशी माहिती कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळे यांनी दिली.**

अनेक मृतदेहांची ओळख पटत नसल्याने पोलिसांनी शास्त्रीनगर रुग्णालयाच्या माध्यमातून बेपत्ता कामगारांच्या नातेवाईकांचे रक्ताचे नुमने घेऊन ते फोरेन्सिक प्रयोगशाळा आणि डीएनए चाचणीसाठी पाठविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. आपल्या बेपत्ता कामगाराची अद्याप ओळख पटत नसल्याने आणि त्याचा शोध लागत नसल्याने अनेक कामगार कुटुंबीय शोकाकूल आहेत. आमच्या कामगारांचा शोध लावून द्या, असा दबाव या कुटुंबीयांकडून तपास यंत्रणांवर वाढत आहे.

अमुदान स्फोट प्रकरण तपासात कोणतेही कच्चे दुवे राहू नयेत म्हणून रासायनिक तज्ज्ञ आणि कंपनीशी संबंधित इतर तज्ज्ञांचे सहभाग आणि त्यांचे मार्गदर्शन घेतले जात आहे. याशिवाय फोरेन्सिक प्रयोगशाळेतील तज्ज्ञ, औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयातील अधिकारी यांचेही मार्गदर्शन घेतले जात आहे. सबळ पुरावे या प्रकरणात आरोपींविरुध्द गोळा करून हे प्रकरण न्यायालयात सादर करण्यापूर्वी भक्कम केले जात आहे. कंपनी स्थळावरून विविध प्रकारचे रासायनिक आणि अन्य नमुने गोळा केले जात आहेत, असे या प्रकरणातील तपास अधिकारी उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस अधिकारी अशोक कोळी यांनी सांगितले.

या स्फोट प्रकरणातील मुख्य आरोपी मलय मेहता याच्या घरातून कंपनी, उत्पादन निगडित




काही महत्वाची कागदपत्रे तपास पथकाने ताब्यात घेतली आहेत. या कागदपत्रांचे आधारे, परवाने, नुतनीकरण आणि त्याप्रमाणे कंपनीतील उत्पादन प्रक्रिया सुरू होती का हे तपासले जाणार आहे. या कंपनीतील बाष्पकला परवानगी नसल्याचे बाष्पक विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे या अनुषंगाने तपास केला जाणार आहे, असे कोळी यांनी सांगितले.

अमुदान आणि लगतच्या सप्तवर्ण, कॉसमॉस केमिकल कंपनीतील एकूण नऊ कामगार अद्याप बेपत्ता आहेत. बचाव कार्य करताना कामगारांचे विविध अवशेष सापडतात. ते एकत्रित करून शास्त्रीनगर रुग्णालयात पाठविण्यात येतात, असे पालिका अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले. मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी आठ कुटुंबीयांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत. याशिवाय स्फोटातील मृतदेहांच्या विविध अवेशषांचे नुमने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. कलिना येथील फोरेन्सिक प्रयोगशाळेत ते तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत, अशी माहिती शास्त्रीनगर रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुहासिनी बडेकर यांनी दिली. आतापर्यंत १८ विविध प्रकारचे नमुने फोरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

## ‘ही मानवनिर्मित आपत्ती’; गेमझोनमधील आगीबद्दल गुजरात उच्च न्यायालयाची टिप्पणी, दोघांना अटक

■ अहमदाबाद: वृत्तसंस्था

गुजरात उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठाने रविवारी राजकोट गेम झोन आगीची स्वत:हून दखल घेत ही प्रथमदर्शनी ‘मानवनिर्मित आपत्ती’ असल्याचे म्हटले आहे. शहरातील असे गेमिंग झोन आणि करमणूक सुविधा सक्षम अधिकाऱ्यांच्या आवश्यक मंजुरीविना निर्माण झाल्या आहेत, असे निरीक्षण न्यायमूर्ती बीरेन वैष्णव आणि देवन देसाई यांच्या खंडपीठाने नोंदवले. खंडपीठाने अहमदाबाद, वडोदरा, सुरत आणि राजकोट महापालिकांच्या वकिलांना कायद्याच्या कोणत्या तरतुदींनुसार या गेमझोनची स्थापना केली किंवा त्यांच्या अधिकाक्षेत्रात सुरू ठेवले, यावर सोमवारी स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले आहेत.



राजकोट येथील गेम झोनमध्ये भीषण आगीत २७ जणांचा मृत्यू आणि तीन जखमी झाल्याची घटना शनिवारी घडली होती. आगीप्रकरणी रविवारी पहाटे राजकोट तालुका पोलिसांनी धवल कॉर्पोरेशनचे मालक धवल ठक्कर, रेसवे एंटरप्राइझचे भागीदार अशोकसिंह जडेजा, किरीटसिंह जडेजा, प्रकाशचंद हिरण, युवराजसिंह सोलंकी, नितीन जैन आणि राहुल राठोड आदींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यात युवराजसिंह सोलंकी आणि नितीन जैन यांना अटक करण्यात आल्याची माहिती राजकोटचे पोलीस उपायुक्त (गुन्हे) पार्थराजसिंह गोहिल यांनी दिली. गेमझोनमध्ये योग्य अग्निशमन उपकरणे नव्हती आणि स्थानिक अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्रही (एनओसी) घेतले नव्हते, त्यामुळे इमारतीत आगीमुळे भीषण घटना घडू शकते हे माहीत असूनही नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

घटनेची चौकशी करून ७२ तासांत अहवाल सादर करण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या पाच सदस्यीय ‘एसआयटी’ने शनिवारी रात्री उशिरा राजकोट गाठून स्थानिक प्रशासनासोबत बैठक घेतली. घटनेतील मृतदेहांची ओळख पटवणे आव्हानात्मक होते.

# ज्या भागांत पाणी तुंबणार, त्याठिकाणी शासन कारवाई करणार; मुख्यमंत्र्यांचा गर्भित इशारा

■ मुंबई: नितीन देवळेकर

**मुंबईतील नालेसफाईचे काम सध्या जोरात सुरु असून महापालिकेचे अधिकारी विशेष लक्ष देऊन ही सफाई योग्य प्रकारे होईल अशाप्रकारे करून घेत आहेत. त्यामुळे नालेसफाई योग्य प्रकारे होत असल्याने मागील वर्षीप्रमाणे यंदाही पाणी तुंबले जाणार नाही. मात्र, ज्या भागांमध्ये यंदा पाणी तुंबले जाईल, त्या भागातील काम चांगले झाले नाही असा समज करून कारवाई करायला शासन मागे पाहणार नाही असा गर्भित इशाराच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.**

त्यामुळे प्रत्येक छोट्या, मोठ्या नाल्यांसह खासगी जागांमधून जाणाऱ्या नाल्यांची सफाई योग्यप्रकारे व्हावी यासाठी प्रत्येक अधिकाऱ्यांनी फिल्डवर राहूनच काम केले पाहिजे असेही आवाहन त्यांनी केले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहरातील जे के केमिकल्स नाला, आणिक वडाळा मार्ग कल्वर्ट, भक्ती पार्क मोनोरेल स्थानकापासून या नालेसफाईच्या पाहणीला सुरुवात केली आणि चुनाभट्टी एटीआय नाला, वांद्रे कुर्ला संकुलातील मिठी नदी, जोगेश्वरी मजास नाला, दहिसर नदी आदींची पाहणी केली. याप्रसंगी स्थानिक आमदार तसेच महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, तसेच सर्व अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त यासह पर्जन्य जलवाहिनी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. नालेसफाई व्यवस्थित झाली पाहिजे म्हणून मी स्वत: पाच ठिकाणच्या नाल्यांची पाहणी केली. या नालेसफाईच्या



कामांसाठी ५४२५ वाहनांचा वापर केला जात असून अनेक ठिकाणी पाणी तुंबले जावू नये आणि त्या पाण्याचा वेळीच निचरा व्हावा यासाठी ४८२ पंप बसवण्यात आले आहेत. पाहणी केलेले नाले असले तरी पूर्वी या नद्या होत्या. पूर्वी या नद्यांमध्ये लोक आंघोळ करायचे, एवढेच नाही तरी आज नाले बनलेल्या नद्यांमध्ये बैजू बावरा यांचेही चित्रीकरण झाले होते. परंतु मलवाहिनीतील पाणी या नदीत जावून ते नाले बनले गेले आहेत. त्यामुळे मल-जल प्रक्रिया केंद्रातील शुध्द केलेले पाणी आता समुद्रात सोडले जाणार असून त्यामुळे समुद्रातील जल प्रदूषण कमी करण्यात यश मिळणार आहे, तसेच आता नाल्यामध्येही मलमिश्रित पाणी जाणार नाही याची काळजी घेतली जाणार असून याच प्रकारे नाल्यातील पाण्यावर प्रक्रिया केले जाणार असल्याने भविष्यात नाल्यातील पाणीही शुध्द झालेले पहायला मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

मुंबईत पावसाळ्यात दरड कोसळण्याच्या शक्यता लक्षात घेता महापालिकेच्यावतीने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नोटीस बजावून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीही होण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण बैठक घेतली असून दुर्घटनेमुळे कोणतीही जिवित किंवा मालमत्तेची हानी होऊ नये म्हणून अशा धोक्याच्या ठिकाणच्या कुटुंबांचे तात्पुरते पुनर्वसन शालेय इमारती किंवा शेडमध्ये न करता एमएमआरडीएच्या प्रकल्प बाधितांच्या घरांमध्ये केले जावे. पावसाळ्या अगोदर कोणत्या प्रकारची कामे करता येतील याबाबत महापालिकेच्या अभियंत्यांसह सर्वांना सूचना करून दरडीचा भाग कोसळणार नाही अशाप्रकारे संरक्षित होती.

## हिमाचल सरकार पाडण्याचे पंतप्रधानांकडूनच जाहीर; राहुल गांधी यांचा आरोप

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या प्रचार सभांमध्ये भ्रष्टाचार आणि पैशाचा वापर करून हिमाचल प्रदेशमधील सरकार पाडणार असल्याची उघडपणे घोषणा केली आहे, असा आरोप कॉंग्रेस नेते



राहुल गांधी यांनी केला.


पंतप्रधान मोदी यांच्या मंडी येथील शुक्रवारच्या भाषणाचा संदर्भ राहुल गांधी यांनी दिला. पंतप्रधानांनी दावा केला की, राज्यातील कॉंग्रेस सरकार टिकणार नाही, असे राहुल म्हणाले. नोटाबंदी आणि जीएसटीच्या अंमलबजावणीद्वारे अदानीसारख्या उद्योजकांना मदत करून लहान व मध्यम व्यवसाय संपवून बेरोजगारी वाढवल्याचा आरोपही राहुल यांनी केला.

कॉंग्रेसचे हमीरपूर लोकसभा उमेदवार सतपाल रायजादा यांना पाठिंबा मागताना गांधी म्हणाले की, लष्करी जवानांसाठी रायजादा यांना पाठिंबा द्या. देशाला दोन प्रकारचे सैनिक नको आहेत आणि केंद्रात सरकार आल्यास अग्निपथ योजना रद्द करणे ही कॉंग्रेसची पहिली प्राथमिकता असेल, असे राहुल गांधी यांनी सांगितले.

## ३७ जातींपैकी काहींना केंद्रीय सूचीतून वगळणार; पश्चिम बंगाल ओबीसी प्रमाणपत्र रद्द प्रकरण

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

२०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीआधी ओबीसी जातींच्या केंद्रीय सूचीत समावेश करण्यात आलेल्या पश्चिम बंगालमधील ३७ ओबीसी जातींच्या छाननीची प्रक्रिया राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने सुरू केली असून निकषात न बसवणाऱ्या त्यातील काही जाती केंद्रीय सूचीतून कायमस्वरूपी वगळल्या जाणार आहेत. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनंतर कोलकाता उच्च न्यायालयाने २०१० नंतर पश्चिम बंगाल सरकारने दिलेली सर्व ओबीसी प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. त्यामध्ये ३७ जातींतील कोणत्या जातींचा समावेश आहे, याची शहानिशा करून या जाती केंद्रीय सूचीतून काढून टाकण्याची शिफारस आयोग केंद्रीय समाजकल्याण मंत्रालयाला करेल. २०१४ मध्ये पश्चिम बंगाल सरकारने एकूण ४६ जातींचा ओबीसींचा केंद्रीय सूचीमध्ये समावेश करण्याची शिफारस केली होती. त्यावेळी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने ९ जातींचा समावेश करण्यास थेट नकार दिला होता. उर्वरित ३७ जाती केंद्रीय सूचीत समाविष्ट करण्यात आल्या. त्यापैकी ३५ जाती मुस्लिम असून २ जाती हिंदू आहेत. ‘या जातींचा राज्य व केंद्र या दोन्ही सूचींमध्ये समावेश असेल व कोलकाता उच्च न्यायालयाने त्यातील काही जातींची



प्रमाणपत्रे रद्द केली असतील तर त्या जाती केंद्रीय सूचीमध्ये कायम ठेवता येणार नाहीत’, असे अहीर यांनी सांगितले. पश्चिम बंगालमधील ओबीसी जातींची यादी २०१० नंतर वेगाने वाढत गेली. १९९७ ते २०१० या काळात ६० ओबीसी जाती होत्या. त्यामध्ये ५४ हिंदू व १२ मुस्लिम होते. २०२२ पर्यंत ओबीसी जातींची संख्या १७९ झाली. त्यातील अ-वर्गात ८१ जाती आहेत. त्यामध्ये ७३ मुस्लिम तर ८ हिंदू जाती आहेत. ब-वर्गातील ९८ जातींमध्ये ४५ मुस्लिम तर, ५३ जाती हिंदू आहेत. या एकूण १७९ जातींपैकी अनेक जातींच्या ओबीसी राज्याच्या सूचीतील समावेशाला उच्च न्यायालयाने आक्षेप घेतला आहे.

## पाण्यासाठी तासगाव तालुक्यात शेतकरी आक्रमक, पोलीसांशी झटापट

■ सांगली: रघुवीर जाधव

विसापूर-पुणदी योजनेच्या पाण्यासाठी सावळज परिसरातील शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाट्यावर रास्ता रोको आंदोलन रविवारी केले. जलसंपदा अधिकारी आल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असे म्हणत आंदोलकांनी ठिय्या मारला. पोलीसांनी आंदोलकांना ताब्यात घेत असताना झटापटही झाली. विसापूर – पुणदी योजनेचे सिद्धेवाडी तलावात सोडलेले पाणी अचानक बंद केल्यामुळे संतप्त झालेल्या सावळजच्या शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाटा येथे रविवारी रस्ता रोको आंदोलन केले. यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. जोपर्यंत संबंधित योजनेचे अधिकारी रास्ता रोकोच्या ठिकाणी येत नाहीत, तोपर्यंत या ठिकाणावरून उठणार नाही, असा आक्रमक पवित्रा



शेतकऱ्यांनी घेतला. पुणदी योजनेचे पाणी सावळजला सोडण्यात आले होते. मात्र एका नेत्याच्या सांगण्यावरून अवघ्या काही तासात हे पाणी बंद करण्यात आले. त्यामुळे सावळज भागातील शेतकरी संतप्त झाले आहेत. पाण्याच्या बाबतीत राजकारण केले जात आहे. अधिकारी नेत्यांच्या सांगण्यावरून पाणी बंद करत आहेत. पाण्याच्या बाबतीत केले जाणारे राजकारण खपवून घेणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. बंद केलेले पाणी तातडीने सुरू करावे, या मागणीसाठी सावळज शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाट्याजवळ सुमारे तासाभरापासून रास्ता रोको सुरू केला आहे. जोपर्यंत अधिकारी येत नाहीत, तोपर्यंत रस्त्यावरून हलणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान आंदोलक शेतकऱ्यांना पोलीसांनी बळाचा वापर करीत ताब्यात घेतले.


## निवडणुकीसंदर्भात मनोज जरांगे यांचं मोठं विधान; म्हणाले, ‘आपल्याला सत्तेत...’

■ मुंबई: यश सावंत

**लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. त्यानंतर काही महिन्यांनी महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. असे असताना बीड लोकसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीमध्ये जातीचं राजकारण झाल्याचा आरोप होत आहे.**

तसेच दोन समाजात तेढ निर्माण होत असल्याचाही आरोप होतो आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच येणाऱ्या काळात सत्तेत जाण्यासंदर्भात त्यांनी मोठं विधान केलं आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते. मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्यासंदर्भात याआधी अनेकदा सूचक विधानं केली आहेत.

‘बीड जिल्हा संतांची भूमी आहे. आमच्या महाराष्ट्रात आणि बीड जिल्ह्यात असं कधी झालं नाही. आम्ही कधीच म्हणणार नाही की एखाद्या समाजाच्या दुकानात जाऊ नका. असे विचार आम्ही ठेवणार नाहीत. जातीय तेढ निर्माण व्हायला काय झालं? १३ तारखेपर्यंत मतदान होईपर्यंत मराठे चांगले होते. १३ तारीख संपली की मराठे वाईट झाले. निवडणुकीत मराठ्यांनी तुमचं काम केलं नाही का? मराठ्यांनो मी



तुम्हाला हात जोडून सांगतो, शांत राहा. आपण फक्त पाहायचं कोण काय करतंय. एक महिनाभर चुका करूद्या, आपण शांत राहा’, असं मनोज जरांगे म्हणाले. मात्र, त्यांच्या या विधानाचा रोख कुणाकडे होता? याबाबत आता तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. ते पुढे म्हणाले, ‘आमचं आंदोलन मोडण्याची कोणाचीही टप्पर नाही. आंदोलन हा संविधानाने दिलेला एक हक्क आहे. काहीजण राजकीय हितापोटी जातीय तेढ निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार असून आम्ही आमच्या हक्कासाठी लढत आहोत. आम्ही शांत आहोत, आम्हाला शांत राहूद्या. जातीय तेढ निर्माण होऊ नये, असं आवाहन बीड जिल्ह्यातील सर्व मराठा बांधवांना करतो. त्यांच काम होईपर्यंत ते सगळ्यांच्या पाया पडले. मात्र, शेवटी एक पर्याय आहे. अन्याय बंद करायचा असेल आपल्याला सत्तेत जावं लागणार आहे’, असं मोठं विधान मनोज जरांगे यांनी केलं.

‘ज्यांनी मराठा समाजावर अन्याय केला, त्यांच्या विरोधात उमेदवार द्यायचा नाही, पण नाव घेऊन त्यांना पाडल्याशिवाय सोडायचं नाही’, असं म्हणत ४ जूनच्या उपोषणावर आपण शंभर टक्के ठाम आहोत. माझ्या समाजाच्या न्यायाचा विषय असून राज्य सरकारने आम्हाला दिलेल्या शब्दाला आज पाच महिने होऊन गेले आहेत. मग राज्य सरकारला अजून किती दिवस पाहिजेत?’,असंही मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

## मैत्रिणी असाव्यात तर अशा! बालविवाह रोखण्यासाठी थेट चाईल्ड हेल्पलाईनला फोन; १२ वर्गमैत्रिणींची केली ‘अशी’ सुटका!

■ छत्रपती संभाजीनगर: प्रथमेश चव्हाण

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आजही बालविवाह केले जातात. उमलत्या वयात मुलींच्या हाती संसाराची दोरी देऊन त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवलं जातं. पण महाराष्ट्रातील एका उपक्रमामुळे आणि वर्गमित्रांच्या सजगतेमुळे १२ बालविवाह रोखण्यास मदत झाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये हे घडलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

एप्रिलमध्ये परीक्षा संपल्यानंतर मे महिन्यात सर्वांचे निकाल जाहीर झाले. विद्यार्थ्यांची प्रगती नोंदवणारं प्रगती पुस्तक प्रत्येकाच्या हातात आलं. यावेळी या प्रगती पुस्तकावर चाईल्ड हेल्पलाईन क्रमांकही देण्यात आले होते. बालविवाहसारख्या प्रथा रोखण्यासाठी सरकार पातळीवर सुरू असलेल्या उपाययोजनेचा भाग म्हणून प्रगती पुस्तकावर चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले आहेत. याच हेल्पलाईन क्रमांकाला फोन करून तब्बल १२ बालविवाह रोखण्यात आले आहेत. महत्त्वाचं म्हणजे ज्या मुलींचे बालविवाह होत होते, त्या मुलींच्या वर्गमैत्रिणींनी आणि वर्गमित्रांनीच चाईल्ड हेल्पलाईन क्रमांकावर फोन करून हे बालविवाह रोखले. १०९८ आणि ११२



हे चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक आहेत. या क्रमांकावर फोन केल्यास पीडित आणि घटनेची माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाते.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेला लग्नाचा मुहूर्त होता. या मुहूर्तावर आणि यापुढील दिवसांच्या मुहूर्तांवर छत्रपती संभाजीनगरमध्ये १२ बालविवाह संपन्न होणार होते. १० मे रोजी चाईल्ड हेल्पलाईन क्रमांकावर काही फोन आले. या फोनवरून संबंधित मुलीची माहिती, नाव आणि पत्ता देण्यात आला. या माहितीच्या आधारे पोलीस आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी हे बालविवाह तातडीने रोखले. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणात बालविवाहांचे प्रमाण जास्त असल्याने महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये बालविवाहविरुद्ध जनजागृती मोहिम राबवण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगरच्या शाळांमध्येही ही योजना राबवली गेली. या मोहिमेचा परिणाम म्हणून १२ बालविवाह रोखण्यात आले. महत्त्वाचं म्हणजे या मोहिमेला प्रतिसाद देत मुलींच्या वर्गमित्र आणि वर्गमैत्रीणींनीच चाईल्ड हेल्पलाईनला फोन करून हे बालविवाह रोखले.